गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज*

दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ अ‍ॅण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ०४.०१.२०२५ | अंक नं. २५८ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



दुकान भाड्याने देणे आहे
नवीपेठ मध्ये पोखरणा ज्वेलर्स शेजारी 300 स्के.फू. दुकान भाड्याने देणे आहे
Mo. 7350012310 / 8888965980

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2099299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


आता घरात चोरी ? अशक्य, ठेवा तुमचं घर, दुकान, आणि ऑफिसला सुरक्षीत
सुखाच्या आणि निवांत झोपेसाठी तसेच विना काळजी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी आजच आपल्या घर, दुकान, ऑफीस इत्यादी ठिकाणी इलेक्ट्रॉनिक सिक्युरिटी आलार्म सिस्टिम बसवा आणि निश्चिंत रहा.
आधिक माहिती आणि प्रात्यक्षीकासाठी संपर्क करा
तेजस एन्टरप्राईजेस
9850176451 / 7028176451

एका नामांकित केटरींग ऑफिससाठी पाहिजेत
अकौंटंट - जागा २ (महिला)
स्टोअर विभाग - जागा ४ (महिला)
स्टोअर विभाग सांभाळण्यासाठी
दोन्ही पदासाठी अनुभव आवश्यक, आकर्षक पगार
- संपर्क -
मो.: 9890298899

5 जानेवारी
आदरणीय दादा
आपण फक्त नेताच नाही तर आमच्यासाठी **प्रेरणा** आणि **मार्गदर्शक** प्रकाशाचा खरा स्रोत आहात.
आमचे मार्गदर्शक
**मा.श्री.दादाभाऊ कळमकर**
आपणांस
दिर्घायुष्याच्या
**मन:पूर्वक शुभेच्छा**

- शुभेच्छुक -
संजय घुले | बाबासाहेब गिरवले | रावसाहेब सप्रे
उद्योजक **रूपचंद कळमकर** | एहसान कासम शेख | सुदाम भोर
JAHAGIRDAR 7499073130


माणुसकी हेच एक बंध, निर्मळ नात, कधी न तुटणारं...
५ जानेवारी ८० वा वाढदिवस..
रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभाग सल्लागार समितीचे अध्यक्ष, माजी आमदार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष
मा. श्री. दादाभाऊ कळमकर आपणांस
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...

❖ शुभेच्छुक ❖
रामचंद्र दिघे (अण्णा) — उपाध्यक्ष, शहरजिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
फारुकभाई रंगरेज — प्रदेश सरचिटनीस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
प्रकाश फिरोदिया — उपाध्यक्ष, शहरजिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी



सर्व सामान्याच्या मनात आदराचे स्थान मिळविलेत...
कामावरची निष्ठा सर्वाबद्दल आस्था...
प्रेम आणि आपुलकीनी गच्च भरलेलं आपलं हृदय
सदैव धडधडतं दुसऱ्यासाठी...
५ जानेवारी
वाढदिवस शुभेच्छा
आमच्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष
मा.आ.श्री. दादाभाऊ कळमकर
प्रदेश उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस
आपणांस वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा !
ऊर्जा, उत्साह, जिद्द आणि संघर्ष यांचं प्रेरणादायी मिश्रण.. मदतीसाठी केव्हाही तयार असणाऱ्या आणि नवउपक्रमांसाठी सतत अग्रेसर असणाऱ्या आपल्या स्वभावगुणांमुळेच आपण यशांची उंची गाठली आहे. यापुढेही आपल्या उज्ज्वल आणि समृध्द जीवनाचा आलेख असाच उंचावत राहो याच मनापासून शुभेच्छा...
- शुभेच्छुक -
श्री. दगडु (मामा) पवार — चेअरमन | श्री. अशोक बाबर — व्हा. चेअरमन | श्री. प्रकाश भिमराज कराळे — मानद सचिव
यशवंत सहकारी ग्राहक भांडार (प्राथमिक)
सावेडी, अहमदनगर.

5 जानेवारी
विनम्र आम्ही, कृतज्ञ आम्ही..!
आपले दिशादर्शक नेतृत्व आणि मार्गदर्शन, हीच आमची **उर्जा** आणि **सामर्थ्य** आहे.
आमचे मार्गदर्शक
**मा.श्री.दादाभाऊ कळमकर**

आपणांस
वाढदिवसाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा
- शुभेच्छुक -
ॲड. अशोकराव कोठारी
ॲड. रविंद्र शितोळे
अशोक बाबर
अंबादास गारुडकर
उद्योजक **बबन कळमकर**
JAHAGIRDAR 7499073130

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## राष्ट्र आणि राज्य

काही काही शब्द समान भासतात पण असत नाही. भासणं अन् असणं यामध्ये बरंच अंतर असतं. राष्ट्र किंवा राज्य याचं भूमीवर स्थान एकच आहे पण भावना बदललेल्या असल्या की संकल्पना भिन्न होतात.

ज्या भूमीवर आपण प्रजाजन म्हणून वावरतो ती भूमी आपल्यासाठी राष्ट्र असते तर आपल्या राजासाठी तीच भूमी राज्य असते.

राज्य म्हणजे भूभाग आणि राष्ट्र म्हणजे त्या भूभागावर निवास करणारी समान विचारांची प्रजा. जोपर्यंत अशी प्रजा त्या भूभागावर असते तोवर ते राष्ट्र जिवंत असतं. अशी प्रजा नष्ट होऊ लागली तर ते राष्ट्रदेखील मृत होतं.

मग अशावेळी राजा कितीही उत्तम राज्यकर्ता असला, शूर पराक्रमी असला तरीही तो राष्ट्र रसातळाला जाण्यापासून वाचवू शकत नाही.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

याउलट एखाद्यावेळी राज्यकर्ता सामान्य क्षमतेचा असला व संपूर्ण प्रजा राज्यनिष्ठ असली तरी राष्ट्र सुरक्षित असू शकतं. अशावेळी स्वामीभक्तीपेक्षाही राज्यनिष्ठा श्रेष्ठ ठरते. महर्षी व्यासांनी विदीत केलेले हे भाष्य आजही तंतोतंत लागू पडते, नाही?

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात राष्ट्रप्रेमी मतदारांनी व काही (सध्याच्याही) उत्तम राज्यकर्त्यांनी राष्ट्र प्रथम हे सिद्ध केले आहे म्हणूनच आपण टिकून आहोत. तुम्हाला पटतंय ना!



# नगरमध्ये युवकावर रस्त्यात चाकूने वार करत खुनी हल्ला

### बंटी राऊतसह आठ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर – जुन्या वादाचा मनात राग धरून आठ जणांनी २३ वर्षीय तरुणास शिवीगाळ दमदाटी करुन चाकूने वार करून, त्याच्या खुनाचा प्रयत्न केल्याची घटना नगर पुणे रोड वरील इम्पिरियल चौकाजवळील एस एस मोबाईल शॉपी जवळ शुक्रवारी (दि.३) रात्री १०.३० च्या सुमारास घडली. या घटनेने त्या परिसरात पळापळ झाली. व्यावसायिकांनी आपली दुकाने पटापट बंद करून घेतली.

या हल्ल्यात विशाल राजेंद्र भंडारी (वय २३, रा. समृध्दी नगर, वाकोडी रोड) असे हल्ल्यात जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. विशाल याचे साधारण ८ ते ९ महिन्यापुर्वी सनी शिंदे, (रा. गांधी मैदान, अ.नगर) यांचे सोबत गांधी मैदान येथे किरकोळ वाद झाले होते. ते वाद मिटवले होते. शुक्रवारी रात्री १० च्या सुमारास विशाल हा त्याच्या मोपेड वरून घरी जात असताना इम्पिरीयल चौकात सनी शिंदे याने त्यास हाक मारली, पण तो थांबला नाही. काही वेळाने विशाल हा रात्री १०.३० च्या सुमारास एस. एस. मोबाईल शॉपी, नगर पुणे रोड येथे थांबलेला असताना त्याच्या पाठीमागे तीन मोटारसायकल वरुन बंटी ऊर्फ भावेश राऊत (रा. माणिक चौक), आशिष ऊर्फ सनी शिंदे (रा. गांधी मैदान), करण फसले, रजत कडव, सचित देसले, अथर्व दिघे, करण शादिजों, उमेश निस्ताने, (सर्व रा.नगर) हे आले. त्यातील बंटी राऊत शिवीगाळ करु लागला, तेव्हा विशाल त्याला म्हणाला की, तु मला शिवीगाळ का करतोस.

त्यावर बंटी राऊत हा म्हणाला 'तू भाई बनू राहीला का तुझा काटा काढतो एकदाचा' असे म्हणुन त्याने शर्टची गंचाडी धरुन मागे ओढले व त्याचे सोबत असणारे आशिष ऊर्फ सनी शिंदे व करण फसलें यांना बंटी राऊत म्हणाला की, मला चाकु दे रे, याला संपवुन टाकतो असे म्हणाला असता करण फसले याने त्याचे कमरेला असलेला चाकु काढला व बंटी राऊत यांचे हातात दिला. तेव्हा बंटी राऊत याचे सोबत असलेल्या साथीदारांना म्हणाला की, यांचे हात पकडा आज यांचा गळा चिरतो असे म्हणुन जिवे ठार मारण्याचे उददेशाने बंटी राऊत याने त्यांचे हातातील धारदार चाकुने विशाल याच्या गळ्यावर जोरात मारत असताना त्याने त्याचा डावा हात मध्ये टाकला असता त्याच्या हाताला लागुन दुखापत झाली. व त्याचवेळी त्याने विशाल याच्या डोक्याचे पाठीमागे, डावे कानाजवळ मारुन दुखापत केली.

त्यावेळी विशाल जीव वाचवत असताना झालेल्या झटापटीत एक वार बंटी राऊत कडून करण फसले यांचे उजवे हातावर लागला, त्याचा फायदा घेत विशाल याने त्याची सुटका करून घेतली. त्यावेळी करण फसले, उमेश निस्ताने, रजत कडव, सचित देसले, अर्थव दिघे, करण शादिजॉ, आशिष ऊर्फ सनि शिंदे यांनी त्याला गचांडुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. यावेळी विशाल जोरजोरात ओरडत असताना त्यावेळी रस्त्याने जात असलेले आशिष विजय शिंदे व सोनु शिंदे असे भांडण सोडवण्याकरिता करण्यासाठी धावून आले असता, त्यांना देखील सनी शिंदे व उमेश निस्ताने यांनी शिवीगाळ करुन तुम्ही येथुन निघुन जा नाहीतर तुमचा देखील काटा काढू अशी धमकी दिली.

हा प्रकार पाहून रस्त्याने जाणारे येणारे तसेच त्या परीसरातील लोकांनी त्यांची दुकान बंद करुन लोक सैरावैरा पळु लागले. त्यावेळी बंटी राऊत व त्याचे सोबत त्यांचे मित्र असे तेथून मोटारसायकलवरुन पळुन गेले. त्यानंतर जखमी विशाल याने जिल्हा रुग्णालयात उपचार घेवून शनिवारी (दि.४) सकाळी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन पोलिसांनी बंटी राउतसह आठ जणांविरुद्ध बी.एन.एस २०२३ चे कलम १०९, ११५ (२), १८९(२), १९१ (२) १९०, ३५२, ३५१(२), भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# जास्त नफ्याच्या आमिषाने महिलेची २३ लाख ३५ हजार रुपयांची फसवणूक

### नगरच्या सायबर पोलिस ठाण्यात २ टेलिग्राम आय डी धारकांवर गुन्हा दाखल

नगर – टेलिग्रामद्वारे संपर्क साधत टास्क पूर्ण करून गुंतवणुकीवर जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून नगर तालुक्यातील एका महिलेची सुमारे २३ लाख ३५ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. २६ डिसेंबर ते १ जानेवारी दरम्यान ही घटना घडली. या प्रकरणी नगर तालुक्यातील चास येथील महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून नगरच्या सायबर पोलीस ठाण्यात २ टेलिग्राम आयडी धारकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी महिलेच्या मोबाईल नंबर वर असलेल्या टेलिग्राम खात्यावर काजोल गालिब व इंद्रा नुयी असा २ वेगवेगळ्या टेलिग्राम आय डी वरून मेसेज आले. त्यास फिर्यादीने प्रतिसाद दिल्यावर त्यांना बक्षीस मिळण्यासाठी ऑनलाईन लिंक पाठवून टास्क पूर्ण करायला लावले. त्यानंतर त्यांचा विश्वास संपादन करून त्यांना आम्ही सांगितल्या प्रमाणे गुंतवणूक करा तुम्हांला आम्ही जास्त नफा मिळवून देतो असे आमिष दाखवले.

गुंतवणुकीवर असे जादा परतावा देण्याचे आमिष दाखवून त्यांना आर्थिक व्यवहार करण्यास भाग पाडले. त्यांच्याकडून २६ डिसेंबर ते १ जानेवारी दरम्यान ऑनलाईन सुमारे २३ लाख ३५ हजार ५८४ एवढी रक्कम घेतली. त्यानंतर फिर्यादी यांनी त्या दोन्ही टेलिग्राम आयडी धारक महिलांशी संपर्क साधण्याचा वारंवार प्रयत्न केला. मात्र त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही दोन्ही टेलिग्राम आयडी धारक महिलांनी फिर्यादी यांना ब्लॉक केले. तब्बल २३ लाख ३५ हजार ५८४ एवढी रक्कम गुंतवून त्यातून काहीच परतावा मिळाला नाही आणि ज्यांच्या कडे रक्कम गुंतवली त्यांच्याशी संपर्क ही होत नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादी महिलेच्या लक्षात आले.

त्यानंतर त्यांनी शुक्रवारी (दि.३) नगरच्या सायबर पोलिस ठाण्यात येवून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी दोन्ही टेलिग्राम आयडी धारक अनोळखी महिला काजोल गालिब व इंद्रा नुयी यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१९ (२), ३१८ (४) सह माहिती तंत्रज्ञान कायदा २००० चे कलम ६६ (ड) नुसार गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम हे करत आहेत.

### आर्थिक गुंतवणूक करताना दक्षता घ्या

दरम्यान, ऑनलाईन गुंतवणूक करून फसवणूक होण्याच्या घटना वारंवार घडत असतानाही नागरिकांकडून कोणतीही खातरजमा न करता आमिषाला बळी पडून लाखो रुपयांची गुंतवणूक केली जात आहे. नागरिकांनी खात्री केल्याशिवाय अशाप्रकारे गुंतवणूक करू नये, आर्थिक व्यवहार करताना दक्षता घ्यावी, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे.

## श्रीमती तुलसाबाई बोगावत यांचे अल्प आजाराने निधन



नगर – माणिकनगर येथील रहिवासी श्रीमती तुलसाबाई पन्नालाल बोगावत (वय ८५) यांचे ३ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संतोष व सतीश बोगावत यांच्या त्या मातोश्री होत.

# बालिकाश्रम रोडवर दिवसा घरफोडी; सोन्याचांदीचे दागिने लंपास

नगर – बंद घराच्या पाठीमागील रूमची खिडकी कशाने तरी तोडून कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश केला. आतील सामनाची उचकापाचक करून बेडरूम मधील कपाटातील तीस हजार रुपये किमतीचे सोन्या चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना बालिकाश्रम रोडवरील, चिंतामणी हॉस्पिटल मागे, गायकवाड मळा येथे गुरुवारी (दि.२) सायंकाळी ५ ते ७ या कालावधीत घडली.

याबाबत श्रीरंग हेमंत पाष्टेकर (वय २५, रा. गायकवाड मळा, चिंतामणी हॉस्पिटल मागे, बालिकाश्रम रोड) यांनी शुक्रवारी (दि.३) तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी पाष्टेकर यांनी गुरुवारी सायंकाळी ५ च्या सुमारास घराला कुलूप लावून त्यांच्या आईला सांगळे गल्ली येथे सोडले व ते ऑफिसला गेले. त्यानंतर ते सायंकाळी ७ वाजता घरी गेले असता त्यांना घरातील सर्व साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले.

त्यांनी घरात पाहणी केली असता त्यांच्या बंद घराच्या दरवाजाचे पाठीमागील रूमची खिडकी कोणीतरी अज्ञात चोरट्याने कशाने तरी उचकाटून तोडली, त्यावाटे आत प्रवेश करून आतील सामनाची उचकापाचक करून घरातील कपाटात ठेवलेले तीस हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी श्रीरंग पाष्टेकर यांनी दिलेला फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (५), ३३१(३), (४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## विमल वामन यांचे अल्प आजाराने निधन



नगर – येथील विमल लक्ष्मणराव वामन (वय ६७, रा.नालेगाव) यांचे ४ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा, सुन, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या डॉ. गरुड यांच्या सासू तर अतुल वामन यांच्या मातोश्री होत.

## मोहन अण्णा मकासरे यांचे ह्रदयविकाराने निधन



नगर – येथील मोहन अण्णा मकासरे (वय ६२, रा.बुरुडगाव) यांचे २ जानेवारी रोजी ह्रदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर बुरुडगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, भाऊ, भावजया, १ बहिण, २ पुतणे असा परिवार आहे.

## अमोल उबाळे (गोंधळी) यांचे अल्प आजाराने निधन



नगर – येथील रहिवासी अमोल बबन उबाळे (गोंधळी, वय ४०, रा.सरपणगल्ली, भिंगार) यांचे ३ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्यावर भिंगार मधील शुक्लेश्वर मंदिराजवळील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, पत्नी, ४ बहीणी, मेहुणे, २ मुले असा परिवार आहे.

## कैलास कलमदाणे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – बुऱ्हाणनगर येथील रहिवासी कैलास पोपटराव कलमदाणे (वय ५०) यांचे ३० डिसेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात आई, एक भाऊ, पत्नी, २ मुली, २ मुले असा परिवार आहे.

त्यांच्यावर बुऱ्हाणनगर येथील स्मशानभूमीत शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## पीएसआय संतोष भाले यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर – सद्गुरू हौसिंग सोसायटी, एन ८, सिडको येथील रहिवाशी पीएसआय संतोष विनायकराव भाले (वय ५७) यांचे ३ जानेवारी रोजी सकाळी ५ वाजता आजारपणामुळे राहत्या घरी निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुली आहेत. त्यांच्या पार्थिवावर ३ जानेवारी रोजी एन ६ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



वाडिया पार्क येथील बंद पडलेला जलतरण तलाव सुरु करण्याबाबत माजी महापौर भगवान फुलसोंदर यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.

# वाडियापार्क येथील बंद जलतरण तलाव सुरु करा

नगर– शहरातील वाडियापार्क मधील जलतरण तलाव मागील सहा महिन्यापासून बंद आहे. तलाव बंद असल्यामुळे शहरातील नागरिकांना त्याचा लाभ घेता येत नाही. या तलावाचा फायदा शहरातील खेळाडू, रुग्ण यांना मोठ्या प्रमाणात होत असतो. जलतरण तलावामध्ये पोहण्याचा व्यायाम होत असल्यामुळे शहरातील नागरिकांचे आरोग्य सुधारते. हा जलतरण तलाव बंद झाल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे .तसेच खेळाडूंचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. हा बंद पडलेला जलतरण तलाव तातडीने सुरु करण्यात यावा अशा मागणीचे निवेदन माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांना दिले. यावेळी बजरंग भुतारे, चंद्रकांत सोनार, भानुदास जगताप, अश्विन जामगांवकर, विजय गांधी, प्रदीप पिपाडा, रमेश लुणिया आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी यांनी तातडीने सार्वजनिक बांधकाम विभागाशी संपर्क साधून तेथील अडचणी काय काय आहेत या विषयी चर्चा केली तसेच येत्या सात जानेवारी रोजी या बाबत मीटिंगचे आयोजित केली असल्याचे सांगितले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी हे यावेळी उपस्थित होते.

# बायपास रस्त्यावरील वाहतूक मार्गात बदल; पोलीस अधीक्षक राकेश ओला यांचे आदेश

नगर – महाराष्ट्र पोलीस रेझिंग डे निमित्त नगर सायकलिंग क्लब व कल्पतरु ग्रुपच्या वतीने रविवारी (दि.५) नगर सायक्लोथॉन राईडचे आयोजन करण्यात येणार आहे. या कालावधीमध्ये वाहतुकीमुळे सायकलपटूंची गैरसोय होऊ नये. तसेच सायकलपटूंच्या सुरक्षिततेस धोका पोहोचून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, याकरीता त्या दिवशी सकाळी ६ ते दुपारी ११ वाजण्याच्या दरम्यान केडगाव बायपासकडून पाथर्डीकडे जाणाऱ्या वाहतूक मार्गात पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी बदल केला आहे.

केडगाव बायपास कडून (अरणगाव बायपास, रेल्वे पुल, वाळुंज बायपास, चाँदबीबी महाल) पाथर्डीकडे उजवी कडील लेनवरुन एकेरी मार्गे पाथर्डीकडे जाईल.

दरेवाडी, छत्रपती शिवाजी महाराज चौक, (वाळुंज) कडे जाणाऱ्या सर्व वाहनांकरीता वाहतुकीचा मार्ग दरेवाडी, छत्रपती शिवाजी महाराज चौक (वाळुंज) कडे उजवी कडील लेनवरुन एकेरी मार्गे जाईल. या आदेशाचे पालन करुन नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी केले आहे.



### जैन वात्सल्य संस्थेकडून गरजू बांधवांना जीवनावश्यक किराणा किटचे वाटप

जैन वात्सल्य संस्थेने साधर्मीक बांधवांना किराणा साहित्याचे वाटप केले. यावेळी वितरणाचा संस्थेचे सभासद अजित विजय बोरा (पिंपळगाववाला) यांच्या हस्ते झाला. संस्थेने १२०० रुपयांचे पोषणमूल्य असलेले जीवनावश्यक साहित्याचे किट वाटप केले. या किटमध्ये गहू, तांदूळ, डाळी, साखर, तेल, मसाले, चहा पावडर, साबण, मीठ आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचा समावेश होता. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अजित बोरा, तेजस डागा, ईश्वर बोरा, अशोक कोठारी आदी उपस्थित होते. संस्थेचे सचिव विजय गुगळे यांनी सूत्रसंचालन करत सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# वर्षभरात ४ टोळ्यांतील २७ सराईत गुन्हेगारांवर लावला 'मोक्का'

### १७ सराईत गुन्हेगार 'एमपीडीए' कायद्यान्वये नाशिक कारागृहात स्थानबध्द

नगर – जिल्ह्यातील गुन्हेगारांचे कंबरडे मोडण्यासाठी पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी कठोर पाऊल उचलून गेल्या वर्षभरात १७ सराईत गुन्हेगारांवर 'एमपीडीए' कायद्यान्वये कारवाई करून त्यांना नाशिकच्या कारागृहात स्थानबध्द केले. तसेच चार टोळ्यांतील २७ गुन्हेगारांवर 'मोक्का' कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.

शहरातील कोतवाली, तोफखाना, भिंगार कॅम्प, नगर तालुका, एमआयडीसी तसेच सुपा, श्रीगोंदा, बेलवंडी, जामखेड, संगमनेर शहर, आश्वी, शिर्डी, कोपरगाव शहर व कोपरगाव तालुका पोलीस ठाणे हद्दीत १७ गुन्हेगारांकडून वाळू तस्करी, दरोडा, जबरी चोरी, घरफोडी यासह अग्निशस्त्र व घातक शस्त्रासह खुनाचा प्रयत्न करणे, खंडणी मागणे, शासकीय कामात अडथळा निर्माण असे गंभीर गुन्हे केले जात होते. त्यांनी सर्वसामान्य लोकांवर दहशत निर्माण करून सार्वजनिक सुव्यवस्था धोक्यात आणली होती.

दरम्यान, त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रचलीत कायद्यान्वये करण्यात आलेल्या प्रतिबंधक कारवाया अपुऱ्या व कूचकामी ठरत होत्या. त्यावर त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांना प्रतिबंध होण्यासाठी संबंधित पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकार्यांनी एमपीडीए कायद्यान्वये प्रस्ताव तयार करून उपविभागीय पोलीस अधिकारी, अपर पोलीस अधिक्षक यांच्या मार्फत अधिक्षक ओला, यांना सादर केला होते. सदर प्रस्तावांची अधिक्षक ओला यांनी बारकाईने छानणी व पडताळणी करून सदरचे प्रस्ताव शिफारस अहवालासह जिल्हादंडाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांच्याकडे पाठविले. त्यांनी जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी १७ गुन्हेगारांना एक वर्षासाठी नाशिक कारागृहात स्थानबध्द केले आहे.

तसेच सन २०२४ मध्ये संघटीतपणे टोळीने गैर कायद्याची मंडळी जमवून अग्निशस्त्रासह खून करणे, खुनाचा प्रयत्न करणे, दरोडा टाकणे, दरोडा टाकण्याचा प्रयत्न करणे, चोरी, जबरी चोरी करणे, सरकारी नोकरास मारहाण करणे, सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, अग्निशस्त्र, घातकशस्त्र जवळ बाळगणे अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या चार टोळ्यांविरूध्द मोका कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.

यामध्ये लोणी येथील अमर बाळू भोसले, पारनेर येथील मिथुन उंबर्या काळे तसेच निघोज (ता. पारनेर) येथील जत्रा हॉटेलवर जेवणाच्या बिलाच्या कारणावरून तलवार, लाकडी दांडके व कोयत्याने गंभीर जखमी करून खुनाचा प्रयत्न करणार्या सागर उर्फ धोंड्या महादु जाधव याची टोळी व तिसगाव (ता. पाथर्डी) येथील मच्छिंद्र तुकाराम ससाणे यांच्या घरावर दरोडा टाकून त्यांची हत्या करणारे उमेश रोशन भोसले याच्या टोळींचा समावेश आहे.

या चार टोळ्यांतील २७ सराईत गुन्हेगारांविरूध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी अधिनियम सन १९९९ च्या कलमांतर्गत प्रस्ताव तयार करून नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांच्याकडे पाठविले होते. त्यांनी या टोळ्यांवर मोका कायद्यान्वये कारवाई केली आहे. गेल्या वर्षभर अधिक्षक ओला यांनी गुन्हेगारांवर केलेल्या या कारवाईसाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी परिश्रम घेतले.

# शेतकऱ्याच्या खिशातून ६७ हजारांची रोकड चोरली

नगर – घोडेगाव कांदा मार्केट येथून कांदा विक्रीचे पैसे घेवून मोटारसायकल वरून वारुळवाडी येथे घराकडे जाणाऱ्या शेतकऱ्याच्या पॅन्टच्या खिशातून ६७ हजार ८० रुपये एकाने नजर चुकवून चोरून नेल्याची घटना बुधवारी (दि.१) सायंकाळी ७ च्या सुमारास मीरावली पहाड जवळील चौकात वारूळवाडीकडे जाणाऱ्या रोडवर घडली.

याबाबतची माहिती अशी की बाबासाहेब देविदास कराळे (वय ३१, रा. मोहटादेवी मंदिरा शेजारी, कासारमळा, कापूरवाडी, नगर) हे घोडेगाव येथून कांदा विक्री करून कांदा विक्रीचे ६७ हजार ८० रुपये त्यांचे खिशात ठेवून त्यांच्या मोटारसायकल वरून घरी आले. त्यावेळी मीरावली पहाड जवळील चौकातून गणेश कुशीनाथ धनगर (रा. कापूरवाडी) हा त्यांच्या मोटारसायकल वर मागे बसलेला होता. त्यानेच आपल्या आपल्या खिशातून नजर चुकवून ६७ हजार ८० रुपये चोरले असल्याचा संशय कराळे यांनी व्यक्त केला. याबाबत कराळे यांनी शुक्रवारी (दि.३) भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी संशयित गणेश धनगर यांच्याविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम ३०३ (२) अन्वये चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### रोज किमान एवढे चालावे

आरोग्य तज्ञांच्या मते, दररोज चालणे अनेक आजारांना आपल्यापासून दूर ठेवते. चालणे हा सर्वोत्तम व्यायाम मानला जातो. हा एक व्यायाम आहे जो कोणत्याही वयोगटातील लोक करू शकतात. चालण्याने लठ्ठपणा कमी होतो. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, प्रत्येक व्यक्तीला दररोज १० हजार पावले चालण्याचा सल्ला दिला जातो.

## पाककला

### नारळी पाकातील खोबऱ्याच्या वड्या

**साहित्य :** एक मध्यम नारळ, पाव किलो साखर, पाव लिटर दूध, पाच-सहा वेलदोडे, पिस्ते, चारोळी.

**कृती :** नारळ खोवून घ्यावा. खोबरे, साखर व दूध एकत्र शिजत ठेवावे. शिजत असताना सारखे हलवावे व गोळा झाल्यावर त्यात वेलचीची पूड घालावी. ताटाला तूप लावून त्यावर तो गोळा थापावा. त्याच्यावर पिस्त्याचे काप व चारोळी टाकावी व हलक्या हाताने थोडेसे थापावे अगर लाटावे. गार झाल्यावर वड्या कापाव्यात.

## वास्तू

### हॉटेलचे प्रवेशद्वार

सर्वसाधारण उपाहारगृह व लॉज या प्रकारातील हॉटेल्स् अत्यावश्यक प्रकारातील मानली जातात. त्यामुळे त्यांचे प्रवेशद्वार पाच मुख्य शुभ प्रवेशद्वारांपैकी खास करुन उत्तर ते पूर्व भागातील असणे अधिक चांगले.

## सल्ला

एटीएम सुविधा उत्तर दिशेला असावी.

## सौंदर्य

आपला हात पाठीपर्यंत पोहचत नसल्याने पाठीची स्वच्छता निट होऊ शकत नाही. यासाठी बॉडी स्पंजचा वापर करावा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. ५ जानेवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष शुक्लपक्ष, पू.भा.२०|१८, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ५० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : काही विशेष करण्याचा प्रयत्न कराल. मनोरंजनासाठी काही प्लॅन कराल. जोखीम असलेल्या कार्यात गुंतवणूक टाळाल.

**वृषभ** : पळापळ देखील अधिक राहील. आरोग्याची काळजी घ्या. धनाचा व्यय होईल. मागील बाकी व उधारी वसुल होईल.

**मिथुन** : कार्यात अडचणी येण्याची शक्यता आहे. आरोग्याची काळजी घ्याल. जुन्या मित्रांची भेट होईल.

**कर्क** : सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल साहाय्याबरोबर सन्मान वाढेल. स्पर्धा, पैजा जिंकू शकाल. लाभ होईल.

**सिंह** : आरोग्याच्या दृष्टीने ही वेळ उत्तम आहे. इच्छित कार्य पूर्ण होतील. उधारी उसनवारी मिळेल. व्यापार उत्तम चालेल. मुलांच्या तब्बेतीची काळजी दूर होईल.

**कन्या** : आर्थिक स्थितीत हळू-हळू सुधार होईल. मागील उधारी उसनवारी मिळेल. मित्रांच्या सहाय्याने अनुकूलता वाढेल एवं दिवस उत्तम जाईल.

**तूळ** : जुनी कामे झाल्यामुळे उत्साह आणि प्रसन्नता वाटेल. महत्वपूर्ण कार्यांवर व्यय होईल.

**वृश्चिक** : चांगले प्रदर्शन करण्यास अडचणी येतील. निवेश प्रत्याशित. मांगलिक, धार्मिक कामात अडथळा.

**धनु** : कौटुंबिक जीवन उत्तम असेल आणि घरातील मंडळी फारच आनंदात राहणार आहे. मागील येणी वसुल होईल.

**मकर** : भावनांच्या भरात वाहून नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक विषयांमध्ये स्थिती सहयोगात्मक राहील.

**कुंभ** : सहकाऱ्यांशी होणारे वैचारिक मतभेद टाळाल. आपणास नवीन संधी मिळण्याची शक्यता आहे. मागील उधारी वसुल होईल.

**मीन** : ग्रहदशेत एक महत्त्वपूर्ण बदल झाल्याने स्त्री पक्षाकडून लाभ मिळेल. प्रगतिवर्धक बातम्या मिळतील. जोखीम असलेल्या कार्यात गुंतवणूक टाळाल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

## पार्टीचा दिवस

मगनलाल शेट अतिशय कंजूष होते. एकदा बातमी पसरली की ते पार्टी देणार आहेत. गावातल्या एका माणसाने शेटजींच्या नोकराला विचारले, 'काय तुझे शेट पार्टी देणार आहेत म्हणे !' नोकर म्हणाला, 'वाट पहा. प्रलयाच्या दिवशीच ते पार्टी देतील.' शेटजीनी ते संभाषण ऐकले. तो माणूस गेल्यावर नोकराला त्यांनी दटावलं, 'पार्टीचा दिवस निश्चित करण्याची तुला काय गरज पडली होती ?'

# जागतिक आश्चर्ये


## जगातील सर्वात मोठे फुटबॉल स्टेडियम

लंडनमधील न्यू वेम्बले स्टेडियम हे जगातील सर्वात मोठे फुटबॉल स्टेडियम आहे. या स्टेडियममध्ये ९०००० प्रेक्षक बसतील अशी आसनव्यवस्था केलेली आहे. त्याच्यावर अर्धवर्तुळाकृती अच्छादित छप्पर आहे. त्याला सपोर्ट म्हणून ५००० टन इतक्या वजनाचे टेकू बनविलेले आहेत.

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०८६

सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) अनवरत; निरंतर ४) सत्त्व; परीक्षा; चाचणी ६) प्रतिबंध; निषिद्ध ७) गुजरातमधील एक नदी १०) प्रजा; जनता ११) एकरूप; तादात्म्य १२) श्वासोच्छ्वास करण्याचे इंद्रिय १४) दारावर हाताची बोटे आपटून केलेला आवाज १७) बीज; बियाणे १८) राहण्याचे ठिकाण; गेह; गृह १९) दूध आटवून तयार केलेला एक खाद्यपदार्थ; मावा २१) एखाद्याची बाजू घेणे; पक्ष २३) सकल; सर्व: सगळे २४) गडबड; घाबरगुंडी; धांदल

**उभे शब्द :-** १) बर्फाचे शिवलिंग तयार होणारे हिमालयातील एक तीर्थक्षेत्र २) गणपतीचे एक नाव ३) तशा प्रकारचा; तसला ४) मनोरंजन ५) लढाई ; युद्ध; रण; संगर ८) एक प्रवासी वाहन ९) एका महिन्यातील सरासरी दिवस १३) टपाल कार्यालय; पोस्ट ऑफीस १५) आवरण; साल; कवच १६) मत्सर; द्वेष; आकस १९) भारतातील पिकांच्या दोन हंगामांपैकी एक २०) खाण्यासाठी घेतलेला अन्नाचा गोळा; कवळ २१) पिकदाणीसारखे पात्र २२) घन; निबिड; गर्द

**शब्दगंध क्र. ७०८५ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ज | य | घो | ष | ■ | वे | त | न |
| नि | ■ | र | डा | र | ड | ■ | वा |
| त्र | स्त | ■ | न | ■ | स | ल | ग |
| ■ | व | त | न | दा | र | ■ | त |
| आ | न | न | ■ | वे | ■ | ब | ■ |
| ग | ■ | म | ■ | दा | मो | द | र |
| ■ | पा | णी | दा | र | ■ | ना | सा |
| सं | प | ■ | वे | ■ | क | म | ळ |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : भाग्यवान ते नसतात ज्यांना सगळं चांगलं मिळतं भाग्यवान तर ते असतात जे त्यांना मिळतं ते चांगलं बनवतात.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## बुच पाण्यावर कसे तरंगते?

आपण बुचाचा तुकडा पाण्यात टाकला तर तो पाण्यावर तरंगतो. ही गोष्ट आपल्याला शेकडो वर्षांपूर्वीपासूनच माहिती होती. पूर्वी बुचाचे मोठे तुकडे बुडत्या माणसाला वाचवण्यासाठी वापरले जात. पाण्यापेक्षा हलकी वस्तू पाण्यावर तरंगते. बूच म्हणजे ओकवृक्षाचं साल. या सालीमध्ये ती वाळल्यावर खूप हवा साठवण्याइतकी पोकळ जागा निर्माण झालेली असते. यामुळे बुचाचा तुकडा पाण्यात टाकला की, या हवेच्या सहाय्यानं तरंगतो.

ओक वृक्ष स्पेन, पोर्तुगाल, अमेरिका व भारतात आढळतात. ते ४० फूट म्हणजे १० मीटरपर्यंत उंच वाढतात. याचे खोड ३ ते ५ फूट (१ ते १ ।। मीटर) व्यासाचे असते. साधारणपणे प्रथम वीस वर्षांनी व नंतर दर नऊ वर्षांनी ओक वृक्षाचे साल काढले जाते. हे चक्र झाड १०० ते १२५ वर्षांचे होईपर्यंत चालते.

बुचाचे तुकडे आज रबरी बुचांमुळे व्यवहारात दिसत नसले, तरी क्रिकेट व हॉकीच्या चेंडूंचा गाभा आणि ध्वनीनियंत्रित खोल्या यात वापरण्यात येतात.

## दुधाचा पेला

एकदा फार मोठा दुष्काळ पडला. त्यामुळे लोकांवर फार मोठी आपत्ती कोसळली. पाऊस, पाणी नसल्यामुळे पीकपाणी आले नाही. प्राण्यांना चारा मिळेना. माणसांना खायला अन्नधान्य मिळेना. तप्त उन्हामुळे लोकांचा जीव नकोसा झाला. त्या वस्तीत सारेच लोक मोलमजुरी करून पोट भरणारे होते. २ ते ४ जण गर्भश्रीमंत लोक होते. त्यांच्या शेतीवाडीवर गावकरी मोलमजुरी करून आपले गुजराण करीत असत. त्या वर्षी दुष्काळ पडल्यामुळे त्या गर्भश्रीमंतांच्या शेतावरही मजुरांना काम मिळाले नाही. सहानुभूती म्हणून त्या शेठजींनी काही दिवस सर्व मजुरांना सांभाळले. शेवटी मजुरांनीच स्थलांतर करण्याची परवानगी मागितली.


नाईलाजाने गावातल्या श्रीमंतांनी त्यांना परवानगी दिली. त्यानंतर गावातले मजूर कुठे जायचे याचा विचार करू लागले. तेव्हा त्यांना एका राज्याचा पत्ता समजला. त्या राज्यात जाण्याचा विचार त्या मजुरांनी केला. काही दिवस प्रवास केल्यानंतर मजुरांचा तो ताफा दुष्काळ नसलेल्या राज्याच्या वेशीपाशी आला. अनोळखी लोक राज्यात प्रवेश करताना बघून वेशीवरच्या सैनिकांनी त्यांना अडवले आणि वेशीपाशीच थांबायला लावले. राजाला वेशीपाशी अनोळखी लोक येऊन थांबल्याची वर्दी देण्यात आली. तेव्हा राजाने आपला दूत त्या लोकांकडे पाठवला. ते कोण लोक आहेत, हे तपास करून यायला सांगितले.

राजाची आज्ञा मिळताच दूत तपास करून आले. त्यांनी राजाला ते मजूर कशासाठी आले त्याबद्दलची माहिती सांगितली. आणि म्हटले की, 'ते आपल्या राज्यात आश्रय मागत आहेत.' त्या दूतांचे बोलणे ऐकून राजा विचारात पडला. राजाने आपल्या प्रधानाला बोलावून सांगितले की, 'या लोकांना आपल्या राज्यात राहू द्यायचे का?' त्यावर प्रधान म्हणाला, 'मी त्यांची परीक्षा घेतो, नंतर आपण ठरवू. ते आपल्या राज्यात कसे राहतील ते आपल्याला समजेल!

प्रधानाने त्या लोकांच्याकडे दूतांकरवी दुधाने भरलेला पेला पाठवला. त्या मजुरांमध्ये एक अतिशय हुशार माणूस होता. त्याला दुधाच्या पेल्याचा अर्थ समजला. त्याने त्या पेल्यात साखर टाकून चमच्याने दूध ढवळून परत पाठवले. प्रधानाने राजाला सांगितले. आलेले मजूर आपल्या राज्यात दुधातल्या साखरेसारखे समरसून राहू इच्छितात. राजाने तात्काळ त्या लोकांना राज्यात राहायला परवानगी दिली.

तात्पर्य : मनमिळावू स्वभावामुळे परका का असेना माणूस सर्वांना प्रिय वाटतो.

# रहमते दर्शन (भाग - १)



अनुवाद भी मराठी में हो चुका है। संत दर्शनसिंह जी ने एक बहुत बड़ी कृपा मुझ पर की और उस घटना का वर्णन मैं यहाँ करना चाहता हूँ। मेरी एक ही बेटी थी। वह पढ़ना चाहती थी, किन्तु हमने उसे पढ़ने से मना कर दिया। उसके दिल को बड़ी चोट लगी, जिस के कारण वह अपना मानसिक संतुलन खो बैठी। परिणामस्वरूप वह छोटे बच्चों जैसी

## दया की भीक

हरकतें करने लगी। हम लोग परेशान हो गये और उसे डॉक्टर के पास ले गये। बहुत इलाज कराया मगर मर्ज़ बढ़ता गया, ज्यों-ज्यों दवा की वाली कहावत साकार हो उठी। हमारी परेशानी की कोई सीमा नहीं थी। हम ारा हाल यह था कि एक आदमी को उसे सँभालने के लिए उसके पास रात को जागना पड़ता था। वह कब उठेगी, कहाँ चली जायेगी, उसका कोई भरोसा न था । आखिरकार हारकर हम दिल्ली महाराज जी के पास चले आये और विस्तार से उन्हें सब कुछ कह डाला। महाराज जी ने हमारी सारी बात बड़े ध्यान से सुनी और इस प्रकार चिंतित होने लगे जैसे यह घटना यह उन्हीं के साथ घटी हो । महाराज जी ने अपने अनोखे अंदाज़ में अपनी आँखें थोड़ी देर के लिए बंद की और कहने लगे, घबराओ नहीं, हुजूर सब ठीक कर देंगे।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

वर्षा ठीक हो जाती है, तब पौधा स्वंय बढ़ता है। मैं उत्साही हूं, खुश हूं, सहयोगी हूं, कल्याणकारी हूं, अपनी इन शक्तियों का बार बार ध्यान करने से मन में विश्वास बढ़ता है। ऐसी मनोवृति होने पर, आप जहां भी जाएंगे लोग आप को सिर आंखो पर बिठाने लगेंगे। जिन के विचारों में शुभ भाव नहीं होता तो लोग उन्हें नगण्य समझते हैं। प्राप्ति पूरी मानव जाती दो महान चीजें हासिल करना चाहती है। एक है खुशी

## दिमाग की शक्ती

और दूसरा है धन । दोनो उदेश्य विश्वास के बिना प्राप्त नहीं किए जा सकते। दुनिया में दो ही इन्सान आप के हितैषी हैं। पहला इन्सान आप खुद हैं तथा दूसरा है भगवान पर विश्वास। भगवान दिखता नही, महसूस होता । भगवान ऐसा इन्सान है जिसे आंख न जाने पर दिल पहचाने। शिव बाबा / ब्रह्मा बाबा या आपने ईष्ट का फोटो हर पल देखते रहें। आप को महसूस होगा जैसे सचमुच भगवान आप के साथ है। विश्वास रखें, आप में अपनी हर मनचाही चीज हांसिल करने की योग्यता है अगर नहीं है तो आ जाएगी। सिर्फ इस विचार को मन से निकाल दें कि आप अपनी मनचाही चीज हासिल नहीं कर सकते।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# साहित्य सहवास - 'आनंद, सुख, समाधान'

प्रत्येकाला वाटतं आनंदी, सुखी, समाधानी रहावं. त्यादृष्टीने पावलं पडतात सुध्दा. पण दुःख, संकट आलं की व्यक्ती खचते. खरं तर हे अगदी स्वाभाविक आहे. दु:खात, संकटात आपली शारीरिक आणि मानसिकता कमी होते. नकारात्मक विचार मनात येतात. खचण्याचा जो क्षण असतो, तोच क्षण सावरण्याचा असतो. दुःख, संकटाच्यावेळी घरातले सदस्य, परिचित, नातेवाईक, मित्रमंडळी आपल्याला शब्दांचा आधार देतातच. 'घाबरु नकोस. अगदी अर्ध्यारात्री मला आवाज दे, मी येईलंच.' ह्या शब्दांचा प्रचंड मोठा आधार मिळतोच. आपली काळजी करणारं, आपल्या हितासाठी सहकार्य करणाऱ्या व्यक्ती पाठिशी, सोबत आहेत ह्याचा आनंद होतोच. आनंदी, सुखी, समाधानी असेलंच असं नाही. तसंच दूसऱ्या एखाद्या व्यक्तीकडे प्रशस्त बंगला, नोकर, चारचाकी आहे म्हणजे तो आनंदी, सुखी असेलंच असं नाही. आनदी, समाधानी सुखी राहण्यासाठी राहण्यासाठी नेमकं काय-काय करता येईल ? एखाद्या व्यक्तीकडे भरपूर पैसे आहेत पण तो आनंदी, सुखी, समाधानी सगळ्यात आधी आपल्या गरजा कमीत कमी असाव्यात. आपल्याजवळ असणाऱ्या पैश्यांतुन अथवा दररोज काम करुन मिळणाऱ्या पैश्यांतुन, दैनंदिन खर्च भागवुन दोन पैसे बचत केलेच पाहिजेत. आपली आवड, छंद जोपासलेच पाहिजेत. ह्यामुळे आपण आनंद राहातोच. समोरच्याकडे प्रचंड पैसा, बंगला, चारचाकी आहे म्हणून त्याचा व्देष न करता, आपणही त्याच्यासारखं होण्याचं ध्येय ठेवलं की समाधानी होतोच. सुख हे आपल्या मानण्यावर अवलंबुन आहे. दैनंदिन जीवन जगण्यासाठी जे अत्यावश्यक आहे, तेवढं असेल तर सुखी आहोत हे समजायचं. पेला, पाण्याने अर्धा रिकामा आहे ह्याऐवजी पेला, अर्धा भरलेला आहे. आणखी अर्धा पेला पाणी, त्यात ओतुन, तो पाण्याने भरलेला पेला, एखाद्या गरजवंताची तहान भागविण्यासाठी देईलच. हा आशावाद, प्रयत्नवाद आनंददायी असतो. एखाद्या व्यक्तीने सकारात्मक, प्रेरणादायी पुस्तकांचे वाचन केले. तो व्यक्ती उत्साहित होईल. आवडीच्या विषयांचे, ऑडिओ ऐकले तर मन प्रसन्न होईलंच. व्याख्यानं ऐकली तर आनंदाचा झरा निश्चितच चांगला वाहता राहिल. दैनंदिन घडणाऱ्या घटनांम धुन चांगलं असं घेतलं अथवा अगदी ठरवुन चांगलं असं पाहिलं, तर आनंद होईलंच शिवाय समाधान मिळेल. सर्वात महत्वाचं म्हणजे चांगलं ऐकुन, चांगलं वाचुन, चांगलं पाहुन, चांगलं करण्याची इच्छा मनात येईलच. अशी व्यक्ती नक्कीच चांगलं असं करणारंच. चांगलं पहाणं, चांगलं ऐकणं, चांगलं वाचन आणि चांगलं करणं ह्यामुळे व्यक्ती नक्कीच आनंदी, सम ाधानी आणि सुखी होईल.

जीवन जगतांना, सगळ्याच गोष्टी आपल्या मनासारख्या होत नसतात. ज्या गोष्टी मनासारख्या झाल्या नाहीत, त्यांची काळजी न करता, आहे ते स्वीकारुन पुढं चालणं आवश्यक आहे. समोरची व्यक्ती कधी कशी वागेल हे कुणालाच सांगता येणार नाही. पण मी चांगलंच वागणार. चांगलंच ऐकणार, चांगलंच वाचणार हे ठाम ठरवुन पावलं टाकली तर आपली वाटचाल आनंद, समाधान, सुखी राहण्याकडे होते आहे, असं समजायला हरकत नाही. शंभर टक्के आनंदी, समाधानी, सुखी कुणीच नाही. पण शंभर टक्केच्या जवळपास आनंद, सम ाधान, सुखी राहण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार, मनापासून प्रयत्न करणार हा आशावाद, आपल्यात जिगर निर्माण करतो. बोलण्यामुळं, सहवासामुळे इतरांना आनंद देण्याचा, समाधानी ठेवण्याचा प्रयत्न करु शकतोच कारण हा मनुष्य जन्म पुन्हा नाही. मग वाईटपणा घेऊन काहीही साध्य करु शकणार नाही. झोपेतुन ऊठताक्षणी, 'जगातल्या प्रत्येकाने आनंदी, समाधानी, सुखी असावं. प्रत्येकाला दुःख झेलण्याची शक्ती मिळावी. जे जे चांगल्या असेल ते ते प्रत्येकाला मिळावं. भारतमातेचं रक्षण करणारे, भारतमातेचे पुत्र मिल्ट्रीतील फौजीभाई आणि अन्नदाता शेतकरीदादा ह्यांच्या प्रति कृतज्ञता करणं. ' - ही प्रार्थना करता येईलंच. ही दिवसाची अत्यंत चांगली सुरुवात आपल्याला आनंद, समाधान नक्कीच मिळवुन देईल. फक्त घेतंच राहाणं ही कृती प्रत्येकवेळी योग्य असेलंच असं नाही. देण्यासारखं सुख कशातंच नाही. रक्तदान करणारा रक्तदाता नेहमीच आनंदी, समाधानी, सुखी असतोच. कारण रक्तदानामुळं अनेकांना जीवनदान मिळतं. मनात येणाऱ्या नकारात्मक विचाराने दुःखी होतो. नकारात्मक विचार मनात येताक्षणी नॉट अलाऊट ह्या तत्वाचा अंगिकार करुन, त्याचक्षणी मन शांत ठेवलंच पाहिजे. मन शांत ठेवणं हा आनंदी, सम ाधानी, सुखी राहण्याचा एक अत्यंत चांगला पर्याय आहे.

(लेख क्र.५३२)

**– सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

तर पूर्ण गर्भावस्थेचे दिवस भरेपर्यंतचे वाट न पाहता प्रसूती लवकर करून मातेचा जीव वाचवावा व जर सोनोग्राफीमध्ये बाळामध्ये कुठल्याच प्रकारची विकृती दिसली नाही व बाळाचे सर्व अवयव प्राकृत दिसले, तर बाळाची पूर्ण वाढ झाल्यावर प्रसूती करून घ्यावी. बहुदा मधुमेह असणाऱ्या गर्भवतींमध्ये गर्भोदक अतिप्रमाणात आढळते.

## गर्भावस्थेतील आजार व उपचार

इ) कमी गर्भोदक : गर्भाभोवती गर्भोदक कमी प्रमाणात असणे यालाच कमी गर्भोदक असे म्हणतात. बाळाभोवती गर्भोदक कमी झाल्याने गर्भाशयामध्ये बाळ गुदमरले जाते. अशा वेळी बाळाची वाढ कमी होते व बाळ लहान दिसते; त्यामुळे गर्भाशयाचा आकार देखील लहान दिसतो. सोनोग्राफीमध्ये गर्भो दक कमी आहे हे समजल्यावर डॉक्टरांकडे बाळाचे डोके व्यवस्थित आहे का, हे पाहण्यासाठी वारंवार तपासणीस जावे; कारण बाळ गुदमरुन दगावण्याची शक्यता असते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# " Transforming Architectural and Construction Projects with 3D Visualization & Animation Walkthrough"






3D व्हिज्युअलायझेशन आणि ॲनिमेशन वॉकथ्रू ही आधुनिक तंत्रज्ञानाची दोन अत्यंत प्रभावी साधने आहेत, जी आर्किटेक्चर आणि कन्स्ट्रक्शनमध्ये वापरली जातात. या तंत्रज्ञानाद्वारे प्रकल्पाची 3D मॉडेलिंग आणि ॲनिमेटेड वॉकथ्रू तयार केली जातात, ज्यामुळे ग्राहक, आर्किटेक्ट्स आणि इतर संबंधित पक्षांना एक स्पष्ट तयार होणाऱ्या प्रकल्पाचे वास्तविक दृश्य पाहता येते.

**3D व्हिज्युअलायझेशन म्हणजे काय?**

3D व्हिज्युअलायझेशन म्हणजे आर्किटेक्चरच्या डिझाईनचा तीन परिमाणी (3D) डिजिटल प्रतिमा तयार करणे. यामध्ये वास्तुकला, इंटेरियर्स, बाह्य वातावरण आणि इतर घटकांची सुसंगत व वास्तवता असलेली प्रतिमा तयार केली जाते. 3D व्हिज्युअलायझेशनमध्ये कॉम्प्युटर जनरेटेड इमेजरी (CGI) चा वापर होतो, जो सर्वात अचूक आणि तपशीलवार माहिती देतो.

**निमेशन वॉकथ्रू म्हणजे काय?**

निमेशन वॉकथ्रू (किंवा व्हिज्युअल वॉकथ्रू किंवा फ्लायथ्रू) म्हणजे एक ॲनिमेटेड टूर, जो 3D मॉडेलमध्ये एका जागेचा किंवा इमारतीचा समग्र अनुभव दाखवतो. हा वॉकथ्रु एका वापरकर्त्याला आर्किटेक्चरमधून चालत किंवा उडत जाण्याचा अनुभव देतो. यात वापरकर्ता 3D मॉडेलमध्ये विविध कोनातून जागा पाहू शकतो, ज्यामुळे त्याला इमारतीच्या डिझाईनचे सजीव आणि सखोल निरीक्षण मिळते.

**आर्किटेक्चर आणि कन्स्ट्रक्शनमधील महत्त्व**

**१. पूर्ण डिझाईनची स्पष्टता आणि समज**

**वास्तविक चित्रण :** 3D व्हिज्युअलायझेशन आर्किटेक्ट्सला इमारतीचे किंवा प्रकल्पाचे अधिक सुस्पष्ट, तपशीलवार आणि वास्तववादी दृष्य प्रदान करते. क्लायंट किंवा इतर संबंधित पक्षांना डिझाईन अधिक चांगल्या प्रकारे समजते.

**जागेचा अनुभव :** ॲनिमेशन वॉकथ्रू, जी इमारतीची व्हिज्युअल वॉकथ्रू किंवा फ्लायथ्रू असते, ती ग्राहकांना इमारतीतील विविध जागा आणि त्यांचे परस्पर संबंध अधिक इंटरएक्टिव आणि सोप्या पद्धतीने दाखवते.

**२. निर्णय घेणे आणि डिझाईन सुधारणा**

**विविध पर्यायांचा अभ्यास :** आर्किटेक्ट्स 3D मॉडेलद्वारे विविध डिझाईन आणि प्लॅनिंग पर्याय तपासू शकतात. निमेशन वॉकथ्रू वापरून त्यांना क्लायंट्ससोबत समजावून सांगता येते.

**त्वरित सुधारणा :** डिझाईनमध्ये त्वरित बदल केले जाऊ शकतात, ज्यामुळे क्लायंट किंवा इतर पक्षांकडून फीडबॅक घेणे सोपे होते.

**३. बांधकामातील सहकार्य आणि समस्यांचे निराकरण**

**बांधकामातील अडचणी ओळखणे :** 3D मॉडेलद्वारे, कन्स्ट्रक्शन टीम बांधकामाच्या अगदी प्राथमिक टप्प्यातच संभाव्य अडचणी ओळखू शकते. यामुळे वांछनीय बदल अगोदर करता येतात.

**क्लॅश डिटेक्शन :** 3D मॉडेल वापरून बांधकामाच्या विविध घटकांमध्ये, जसे की इलेक्ट्रिकल, सिव्हिल, आणि HVAC (हिटिंग, व्हेंटिलेशन, आणि एसी) यामधील क्लॅशेस ओळखता येतात. हे बांधकामाच्या वेळेत होणारे खर्च आणि विलंब कमी करते.

**४. नियामक मंजुरीसाठी मदत**

**अधिकृत सादरीकरण :** इमारती किंवा प्रकल्पांच्या नियामक परवानग्या मिळविण्यासाठी 3D व्हिज्युअलायझेशन आणि वॉकथ्रू वापरले जातात. यामुळे अधिक स्पष्टता आणि सुस्पष्टता मिळते, ज्यामुळे परवानगी मिळवणे सोपे होते.

**समुदाय सहभाग :** खासकरून मोठ्या शहरी प्रकल्पांसाठी, 3D व्हिज्युअलायझेशनचा वापर सार्वजनिक सल्लामसलतीसाठी आणि समाजाची मते जाणून घेण्यासाठी केला जातो.

**५. सततता आणि पर्यावरणीय विश्लेषण**

**ऊर्जा कार्यक्षमता तपासणी :** 3D मॉडेल आणि निमेशन वॉकथ्रूचा वापर करून इमारतीच्या ऊर्जा कार्यक्षमतेचे आणि पर्यावरणीय परिणामांचे विश्लेषण केले जाऊ शकते. उदाहरणार्थ, सूर्यप्रकाश, हवा, आणि पाणी व्यवस्थापन तपासले जाऊ शकते.

**स्मार्ट डिझाईन :** यामुळे डिझाईन अधिक इको-फ्रेंडली आणि टिकाऊ बनवता येते.

**विक्री आणि विपणन क्षेत्रातील महत्त्व**

**१. पूर्व विक्रीचे भावी सादरीकरण**

**वास्तविक आणि सुस्पष्ट विपणन :** 3D व्हिज्युअलायझेशन आणि निमेशन वॉकथ्रू प्रकल्पांचे अधिक वास्तववादी आणि भावी दर्शन करतात. हे ग्राहकांना प्रकल्प पूर्व स्थितीत कसा दिसेल याचे स्पष्ट चित्रण करते, ज्यामुळे त्यांना योग्य निर्णय घेण्यात मदत होते.

**व्हिज्युअल स्टेजिंग :** इमारतीतील रिकामी जागा किंवा खोलींमध्ये व्हिज्युअल फर्निचर आणि सजावटीचा समावेश करून 3D मॉडेल बनवता येते, ज्यामुळे ग्राहकांना त्या जागेचे अधिक आकर्षक आणि उपयोगी दृश्य दाखवता येते.

**२. ग्राहकांच्या भावनिक दृष्टिकोनाचा विकास**

**आवड निर्माण करणे :** 3D वॉकथ्रू ग्राहकांना किंवा गुंतवणूकदारांना एक भावनिक संबंध निर्माण करायला मदत करतात, कारण ते प्रकल्पाला वास्तविकतेशी जवळपास जोडतात.

**स्पष्ट आणि थेट संप्रेषण :** 2D ड्रॉइंग किंवा पारंपरिक फ्लोर प्लॅनच्या तुलनेत, 3D व्हिज्युअलायझेशन अधिक थेट आणि आकर्षक आहे. त्यामुळे संभाव्य ग्राहक अधिक आकर्षित होतात.

**३. कस्टमायझेशन आणि इंटरॅक्टिव अनुभव**

**ग्राहकांच्या इच्छेनुसार सानुकूल बदल :** 3D व्हिज्युअलायझेशनमधून ग्राहक त्यांच्या इच्छेनुसार इंटेरियर्स, रंग, फर्निचर आणि इतर घटकांची सानुकूल डिझाईन पाहू शकतात. आंतरक्रियाशील अनुभव: ॲनिमेशन वॉकथ्रूमुळे ग्राहकांना एक संपूर्ण व्हिज्युअल टूर दिली जाते, ज्यामुळे त्यांना प्रत्येक कोनातून जागा पाहण्याचा आणि तपासण्याचा अनुभव मिळतो.

**४. ऑनलाइन आणि ऑफलाइन विपणन**

**ऑनलाइन प्रचार :** वेबसाइट, सोशल मीडिया, आणि इतर डिजिटल माध्यमांवर 3D व्हिज्युअलायझेशन आणि निमेशन वॉकथ्रू सादर केल्याने प्रकल्पाची भावी मार्केटिंग केली जाते.

**प्रदर्शनासाठी आकर्षक सामग्री :** विक्री सादरीकरणे, विपणन व्हिडिओ, आणि ब्रॉशर्समध्ये 3D व्हिज्युअलायझेशन वापरले जाते, ज्यामुळे संभाव्य खरेदीदारांना अधिक माहिती मिळते.

**५. विक्री प्रक्रियेत गती आणणे**

**फास्ट निर्णय घेणे :** ग्राहकांना 3D वॉकथ्रू पाहिल्यावर, ते आपल्या निर्णयावर लवकर पोहोचू शकतात. त्यामुळे विक्री प्रक्रिया जलद होते.

**फीडबॅक साधणे :** 3D व्हिज्युअलायझेशनच्या माध्यमातून ग्राहकांचे फीडबॅकचे स्पष्ट आणि जलद संकलन केले जाते, ज्यामुळे डिझाईन किंवा बांधकाम प्रक्रियेत त्वरित बदल करता येतात.

**निष्कर्ष**

3D व्हिज्युअलायझेशन आणि ॲनिमेशन वॉकथ्रू आर्किटेक्चर, कन्स्ट्रक्शन, आणि मार्केटिंग क्षेत्रामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. हे तंत्रज्ञान फक्त डिझाईन आणि बांधकाम प्रक्रियेला सुस्पष्टता, कार्यक्षमता, आणि खर्च कमी करण्याची क्षमता प्रदान करत नाही, तर विक्री आणि विपणन प्रक्रियेतही गती आणते. हे तंत्रज्ञान ग्राहकांसोबत संवाद वाढवते, त्यांना निर्णय घेण्यासाठी उपयुक्त माहिती पुरवते, आणि संपूर्ण प्रकल्पाची प्रक्रिया अधिक प्रभावी बनवते. 3D व्हिज्युअलायझेशन आणि निमेशन वॉकथ्रू हे आधुनिक आर्किटेक्चर आणि कन्स्ट्रक्शन क्षेत्रात एक अनिवार्य साधन बनले आहे.

**आमच्याबद्दल :** CREATIVE SUDIO 3D व्हिज्युलायझेशन आणि निमेशन वॉकथ्रूच्या व्यवसायात १० वर्षांपेक्षा अधिक काळ आहे. आपण आमचं कार्य Behance वेबसाइटवर पाहू शकता.

https://www.behance.net/roshangugale8866.



CREATIVE STUDIO
**Roshan Gugale** (BE Civil)
Contact: 8805025000
Office : First Floor,
Adarsh SamruddhiApartment,
Choupaty Karanja,
DelhiGate.
Ahilyanagar. 414001

CREATIVE
8805025000

आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर
AESA
www.aesanagar.com




चितांबर विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनात विविध प्रदर्शनांचे उद्घाटन करण्यात आले.

## चितांबर विद्यालयात विविध प्रदर्शनांचे उद्घाटन

नगर – नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग. ज. चितांबर विद्या मंदिर प्रशालेत वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने आयोजित विविध प्रदर्शनांचा उद्घाटन समारंभ झाला. नव विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. अनिरुद्ध गीते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यानिमित्ताने शाळेमध्ये गणित – विज्ञान, भूगोल – पर्यावरण, रांगोळी, चित्रकला, संगणक तसेच अटल टिंकरिंग लॅबमध्ये भरवलेल्या प्रदर्शनांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेच्या विविध क्षेत्रात यशस्वीरित्या कार्यरत असणाऱ्या शाळेच्या माजी विद्यार्थिनी डॉ. शितल खेडकर – पोखरकर, डॉ. वैशाली भापकर – आठरे, डॉ. पियुषा सोनग्रा – सिसोदिया, डॉ. आरती करांडे – बाबर, सुरेखा विजय गोफणे – लवांडे, तृप्ती बेलेकर यांनी विद्यार्थ्यांनी भरवलेल्या विविध प्रदर्शनांचे उद्घाटन तसेच कौतुक केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. विभावरी रोकडे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. विजय कुलकर्णी व प्रशांत कुलकर्णी यांनी परिचय करून दिले.

मंजुषा जोशी यांनी सूत्रसंचालन केले तर संमेलन कार्यवाह अंजली हरिश्चंद्रे यांनी आभार मानले.

## नामदार राम शिंदे सर्वसामान्यांचा आवाज

### यशवंत तोडमल यांचे प्रतिपादन; विकासकामाचा शुभारंभ

नगर – आमच्या विद्यार्थी संघटनेची विचारधारा ही कष्टकरी शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठीची आहे आणि नामदार राम शिंदे हे सुद्धा एका शेतमजूराचा मुलगा आहे त्यामुळे त्यांच्यात व आपल्यात एक वेगळा ऋणानुबंध आहे. फक्त सातत्यपूर्ण काम आणि कष्टकरी जनतेसाठी स्वतःच्या क्षमतांचा वापर करून जनतेला जपणे यामुळेच ते इतर लोक प्रतिनिधींपेक्षा वेगळे ठरतात. स्मारकाच्या विकास कामासाठी निधी मिळावा म्हणून आम्हाला अनेक ठिकाणी वणवण करावी लागते, परंतु आम्ही फक्त एकदाच निधी मिळावा अशी अपेक्षा ना. शिंदे यांच्याकडे व्यक्त केली. त्यांनी आपल्या चळवळीला पाठिंबा देत त्वरित छत्रपतींच्या स्मारकासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला. ते आज मोठ्या पदावर कार्यरत आहेत परंतु ते आजही आणि पुढे सुध्दा सर्व सामान्यांचेच नेते असतील, असे प्रतिपादन स्मायलिंग अस्मिताचे कार्याध्यक्ष यशवंत तोडमल यांनी केले.




विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या निधीतून छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक येथे ऐतिहासिक कमानीच्या कामाचा नारळ फोडून शुभारंभ करण्यात आला.

नविन वर्षाच्या पहिल्याच दिवशी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या निधीतून छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक येथे ऐतिहासिक कमानीच्या कामाचा नारळ फोडून शुभारंभ करण्यात आला. यावेळी छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक समितीचे सचिव रिनुल नागवडे, तुषार सोनवणे, धिरज कुमटकर, अतुल देठे, राहुल भागवत आणि स्मायलिंग अस्मिताचे कार्याध्यक्ष यशवंत तोडमल उपस्थित होते.

दरम्यान स्मारक समितीचे सचिव रिनुल नागवडे म्हणाले की जेव्हा लोकप्रतिनिधी सर्व विचारधारांना जपतो तेव्हाच खरी लोकशाही जिवंत असते. आज स्मारकाचे काम राज्यभर गाजत आहे. ना. शिंदे यांच्या प्रमाणे इतरही लोकप्रतिनिधींनी आता पुढाकार घेऊन छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारकासाठी योगदान द्यावे. बांधकाम व्यावसायिक धिरज कुमटकर यांनी सुरू असलेल्या विकासकांची माहिती व उद्दिष्टे उपस्थितांना सांगितली. तर तुषार सोनवणे यांनी सुरू असलेल्या विकासकांची प्रशंसा करत पुढील कामासाठी शुभेच्छा दिल्या. इतिहास प्रेमी राहुल भागवत यांनी आभार मानले.

## जिल्ह्यातील सौर प्रकल्पांच्या कामांना गती द्या : जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ

नगर – शेतकऱ्यांना अखंडित वीज उपलब्ध व्हावी यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यात सौर प्रकल्पासाठी प्रशासनाने जमीन उपलब्ध करून दिली असून प्रकल्पांच्या कामांना संबंधित संस्थेने गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.



जिल्ह्यातील सौर प्रकल्पांबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली.

जिल्ह्यातील सौर प्रकल्पांबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस पोलीस अधीक्षक राकेश ओला (दूरदृश्यप्रणालीद्वारे), जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, महावितरण आणि वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

श्री.सालीमठ म्हणाले, जामखेड तालुक्यातील रत्नापूर येथे दोन ते तीन दिवसात काम सुरू करावे. कर्जत तालुक्यातील बेलवंडी येथील जुन्या गावठाणातील जागा सौर प्रकल्पासाठी उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्ताव तयार करावा आणि संस्थेने तेथील काम तातडीने सुरू करावे. याच बांभोरा उपकेंद्राच्या परिसरात १० मेगावॅट प्रकल्पासाठी ३० एकर जागा निश्चित करण्यात यावी. शासकीय सौर प्रकल्पांना विरोध करणाऱ्यांवर आवश्यक कारवाई करावी.

जामखेड तालुक्यातील खर्डा येथे तांत्रिक अडचणी असल्याने वाकी आणि नायगाव येथील जागेला भेट देऊन प्रकल्प उभारणीच्यादृष्टीने पाहणी करावी. राहाता तालुक्यातील केळवड येथील प्रकल्पाचे काम त्वरित सुरू करावे. या ठिकाणी जागेची उपलब्धता लक्षात घेऊन ५ मेगावॅटपेक्षा अधिक वीज निर्मितीसाठी प्रयत्न करावे.

अहिल्यानगर तालुक्यातील गुंडेगाव प्रकल्पाचे काम सुरू करावे, त्या जागेकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी प्रस्ताव तयार करावा. श्रीगोंदा तालुक्यातील खरातवाडी येथील नागरिकांशी संवाद साधून काम सुरू करण्यात यावे. शेवगाव तालुक्यातील दहिगाव, शहर टाकळी परिसरात प्रकल्पासाठी जागेचा शोध घेण्यात यावा. खापरेवडी, हकलापूर, राहाता, संगमनेर तालुक्यातील धांदरफळ, श्रीरामपूर सूतगिरणी परिसर, राहुरी तालुक्यातील वांबोरी, पारनेर मधील लोणी मावळा, जावळा, राळेगाव, नेवासा एमआयडीसी, संगमनेर मधील पेमगिरी, कोपरगाव तालुक्यात चास, आणि जामखेड तालुक्यातील राजुरी येथे देखील जागा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. संबंधित संस्थेने भाडेतत्त्वावर खासगी जागेचा शोध घ्यावा, प्रशासनातर्फे समन्वय साधण्यासाठी सहकार्य करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

सौर प्रकल्पाची कामे करतांना सुरक्षेच्यादृष्टीने समस्या येऊ नयेत यासाठी पोलिसांचे सर्व सहकार्य राहील असे पोलीस अधीक्षक श्री.ओला यांनी सांगितले.

कर्जत तालुक्यातील निमगाव डाकू येथे प्रकल्पाचे काम सुरू झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## कुपोषणमुक्तीसाठी जिल्हा प्रशासनाचे सकारात्मक पाऊल

नगर – जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील दुर्गम आणि आदिवासी भागांतील तीव्र कुपोषित बालकांना कुपोषणमुक्त करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सकारात्मक आणि कृतीशील पावले उचलली आहेत.

जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांनी स्वयंप्रेरणेने प्रत्येकी दोन तीव्र कुपोषित बालके तर तालुकास्तरावरील तालुका आरोग्य अधिकारी, बाल विकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, पर्यवेक्षिका, सरपंच, मुख्याध्यापक, शिक्षक, पोलिस पाटील यांनी प्रत्येकी एक याप्रमाणे अहिल्यानगर जिल्ह्यातील ६१ तीव्र कुपोषित बालकांना त्यांचा सर्वसाधारण श्रेणीमध्ये समावेश होईपर्यंत दत्तक घेऊन या मोहिमेला व्यापक स्वरूप दिले आहे.

शासनाच्या विविध योजनांच्या आधारे या भागातील बालकांची उंची आणि वजनाच्या तपासणीतून त्यांची कुपोषण श्रेणी निश्चित केली जाते. त्यानुसार बालकांना कुपोषणाच्या तीव्रतेतून बाहेर काढण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. विशेषतः ग्राम बाल विकास केंद्रांच्या माध्यमातून ऊर्जा–घनयुक्त पोषण आहार (ईडीएनएफ) पुरवण्यात येत आहे.

कुपोषीत बालके दत्तक घेतलेले अधिकारी–कर्मचारी तीव्र कुपोषित बालकांना गृहभेटी देणार आहेत. शासनस्तरावरुन मिळाणाऱ्या आहारा व्यतिरिक्त पौष्टीक आहार पुरविणे, आरोग्य विषयक समस्या उदभवल्यास त्यांचे लागलीच निराकरण करुन संदर्भ सेवा पुरविणे, वैद्यकीय सल्ल्यानूसार आवश्यक असलेली औषधे, शक्तीवर्धक गोळ्या / सिरप स्वखर्चाने पुरविणे, त्यांची देखरेख करणे इत्यादी कार्यवाही करुन तीव्र कुपोषित बालकांना साधारण श्रेणीमध्ये आणण्याचे शर्थीचे प्रयत्न करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी मनोज ससे यांनी दिली आहे.

## ए.एच.पोखरणा ज्वेलर्समध्ये मकर संक्रांतीनिमित्त पैंजण जोडवी महोत्सव

### चांदीच्या सर्व वस्तूंच्या मजुरीवर मिळणार ५० टक्के सवलत

नगर – नवीन वर्षात येणारा पहिलाच सण म्हणजे मकर संक्रांत. या सणाला तिळगुळाची, पतंगाची परंपरा आहे. तसेच महिलांसाठी सौभाग्याच प्रतिक म्हणून संक्रांतीच्या हळदी कुंकवालाही महत्त्व आहे. या सणाचे चांदीचे दागिने, वस्तूंशी असलेले नाते लक्षात घेऊन ए.एच.पोखरणा ज्वेलर्सने पैंजण जोडवी महोत्सव आयोजित केला आहे. यात ग्राहकांना चांदीच्या सर्व वस्तूंच्या खरेदीवर मजुरीवर ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. सर्जेपुरा आणि स्टेशन रोडवरील सथ्था कॉलनी या दोन्ही दालनात हा महोत्सव असल्याची माहिती अमित पोखरणा व आकाश पोखरणा यांनी दिली.



ए.एच.पोखरणा ज्वेलर्समध्ये मकर संक्रांतीनिमित्त पैंजण जोडवी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

विविध सण उत्सवानिमित्त सोने चांदी खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी आकर्षक योजना राबवून त्यांना खरेदीचा आनंद मिळवून दिला जातो. आताही पैंजण जोडवी महोत्सवात चांदीचे दागिने, विविध वस्तूंचे मोठे कलेक्शन दालनात उपलब्ध करून देण्यात आले आहे. यात जोडवे, पैंजण, करंडा, ताट, वाटी, चमचा, ग्लास, तांब्या, विविध देवतांच्या मूर्ती, दिवा, अत्तरदाणी, गुलाबदाणी, अगरबत्ती स्टॅण्ड, जग, फुलपात्र, समई, घी लोटी, डब्बा, पूजा थाळी, बेबी सेट, सिंहासन, चांदीचे पेन, गणपतीचे अलंकार, छल्ला, कडली, चैन, ब्रासलेट, चांदीची नाणी, लहान मुलांसाठी कंबर साखळी, अंगठी, बाळी, टॉप्स, कानातले, चैन पेंडंट, शोपीस, गिफ्ट सेट, डिनर सेट, स्टर्लिंग तसेच चांदीच्या अनेक वस्तू उपलब्ध आहेत.

चांदीची शुद्धता, आकर्षक कलाकुसर आणि भरपूर व्हरायटी उपलब्ध असल्याने ग्राहकांना मनपसंत खरेदीची पर्वणी साधता येणार आहे. मकर संक्रांतीच्या तिळगुळाचा गोडवा अधिक करण्यासाठी ग्राहकांनी या महोत्सवात खरेदीचा आनंद घ्यावा असे आवाहन ज्वेलर्सच्या वतीने करण्यात आले आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सामाजिक कार्याची प्रचिती देशभर

## अरविंद दुगड यांचे प्रतिपादन

नगर – सर्वसामान्यांना आरोग्यसेवेसाठी आधार ठरलेल्या आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्य देशभरात पसरले आहे. कोलकत्ता येथे देखील या हॉस्पिटलच्या सामाजिक कार्याची माहिती मिळाली. आनंदऋषीजी महाराजांच्या आशिर्वादाने येथील प्रत्यक्ष सामाजिक कार्य पाहण्याचा योग आला. विविध आजाराने ग्रासलेल्यांचे जीवन वेदनामुक्त होण्यासाठी माणुसकीच्या भावनेने सुरु असलेल्या आरोग्यसेवेच्या कार्याने भारावल्याची भावना कोलकत्ता येथील उद्योजक अरविंद दुगड यांनी व्यक्त केली.



जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये कोलकत्ता येथून आलेल्या दुगड परिवाराच्या वतीने आयोजित मोफत दंतरोग तपासणी व उपचार शिबिराच्या उद्घाटन करताना अरविंद दुगड, सुषमा दुगड, पुनीत दुगड, सतीश बोथरा, प्रतिभा बोथरा आदी.

### दंतरोग तपासणी शिबिरात १५० रुग्णांची मोफत तपासणी

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये कोलकत्ता येथून आलेल्या दुगड परिवाराच्या वतीने आयोजित मोफत दंतरोग तपासणी व उपचार शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी अरविंद दुगड बोलत होते. याप्रसंगी सुषमा दुगड, पुनीत दुगड, सतीश बोथरा, प्रतिभा बोथरा, गौरव बोथरा, डॉ. वसंत कटारिया, संतोष बोथरा, सीए आयपी अजय मुथा, सतीश लोढा, निखिलेंद्र लोढा, डॉ. आशिष भंडारी, सुनिल मालू, श्रेयश कांकरिया, सुमित लोढा, प्रकाश छल्लाणी, दंतरोग तज्ञ डॉ. प्राची गांधी, डॉ. अपर्णा पवार आदी उपस्थित होते.

डॉ. प्राची गांधी यांनी दात सफाई करण्याबरोबर सर्व सुविधा व उपचार हॉस्पिटलच्या दंत विभागात उपलब्ध आहेत. सुपर स्पेशालिटी तज्ञ डॉक्टरांची टीम सेवेसाठी सज्ज आहे. अत्यल्प दरात रुग्णांना दंत व जबड्यासंबंधी सर्व उपचार पध्दतीची सेवा मिळत आहे. दर शनिवारी दंत रोग विभागाची ओपीडीची मोफत व इतर वेळेस सवलत दिल्या जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

दंतरोग तपासणी शिबिरात १५० रुग्णांची मोफत दंत तपासणी करण्यात आली. दंतरोग तज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची दंत तपासणी करुन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरामध्ये मेटलकॅप, सिरॅमिक कॅप, रुट कॅनल, दातांची कवळी बसविणे, दात साफ करणे व दातांमध्ये सिमेंट भरणे आदी उपचार अल्पदरात उपचार करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. आभार निखिलेंद्र लोढा यांनी मानले.

कोलकत्ता येथील दुगड परिवाराने हॉस्पिटलच्या विविध विभागाची पहाणी करुन सुरु असलेल्या आरोग्यसेवेचे कौतुक केले.

# कुराश राष्ट्रीय शालेय स्पर्धेत यंग मेन्स ज्युडोच्या ३ खेळाडूंची निवड

नगर – २ ते ६ जानेवारी दरम्यान रायपूर छत्तीसगड येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय कूराश स्पर्धेत यंग मेन्स ज्युडो असो. च्या सिद्धिबाग ज्युडो हॉलमधील कुमारी ऋचा बोगा ४४ किलो खाली, सिद्धी दातरंगे ४८ किलो वरील यांची १४ वर्षाखालील गटाच्या महाराष्ट्र कुराश संघात तर आर्यन आगरकर याची १९ वर्षा खालील ९० किलो वरील वजन गटात महाराष्ट्र संघात निवड झाली.



कुराश राष्ट्रीय शालेय स्पर्धेत यंग मेन्स ज्युडोच्या निवड झालेल्या तीन खेळाडू समवेत प्रा. संजय धोपावकर, आदित्य धोपावकर, शुभम दातरंगे आदी.

रायपूर येथील स्पर्धेत तीनही खेळाडू पदक विजेते ठरतील, असा विश्वास त्यांचे प्रशिक्षक व राष्ट्रीय विजेते आदित्य धोपावकर याने दाखवला.

सर्व खेळाडूंना मुख्य मार्गदर्शक प्रा. संजय धोपावकर यांचे मार्गदर्शन तर महाराष्ट्र कुराश असोसिएशनचे अध्यक्ष अंकुश नागर, सहाय्यक मार्गदर्शक शुभम दातरंगे, महाराष्ट्र कुराश असोसिएशनची टेक्निकल डायरेक्टर सोनाली साबळे यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले.

# आंतर विद्यापीठ मल्लखांब स्पर्धेसाठी नगरचे प्राची खळेकर व आदिनाथ साठे यांची निवड

नगर – येथील अहिल्यानगर मल्लखांब व योगा सेंटरच्या प्राची खळेकर आणि आदिनाथ साठे यांची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मल्लखांब स्पर्धेसाठी निवड झाली असून त्यांचा सत्कार करून सेंटरच्यावतीने शुभेच्छा देण्यात आल्या




५ ते ८ जानेवारी रोजी भोपाळ येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मल्लखांब स्पर्धेसाठी अहिल्यानगर मल्लखांब व योगा सेंटरच्या एकूण २ खेळाडूंची निवड झाली आहेफमुलींच्या गटात प्राची विजय खळेकर व मुलांच्या गटात आदिनाथ सुनील साठे यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून निवड झाली आहे. या खेळाडूंना संस्थेचे मुख्य प्रशिक्षक अनिकेत सुसरे व प्रशिक्षिका प्राजक्ता दळवी यांचे मार्गदर्शन लाभले.

# श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टतर्फे ७ ते ११ जानेवारी दरम्यान विविध कार्यक्रम

## अयोध्या येथील श्रीरामलल्ला प्राणप्रतिष्ठा वर्षपुर्ती दिवस ११ जानेवारीस होणार

नगर – श्रीराम मंदिर, नविपेठ, श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने तिथीनुसार अयोध्या येथील श्रीरामलल्ला प्राणप्रतिष्ठा वर्षपुर्ती दिनानिमीत्त श्रीराम मंदिर नवीपेठ येथे श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने अयोध्या प्रमाणेच प्रतिष्ठा द्वादशी उत्सव ७ ते ११ जानेवारीपर्यंत ५ दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच अयोध्या येथील मंदिराप्रमाणे आकर्षक मंदिर सजावट ट्रस्टच्यावतीने करण्यात येणार आहे. सर्व शहरवासियांनी सहकुटूंब उपस्थित राहुन प्रभु श्रीरामांच्या दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम मुथा व उपाध्यक्ष निखील शेटिया यांनी केले आहे.



७ जानेवारी रोजी सकाळी ७:१३ वा. पासुन ८ जानेवारी सकाळी ७:१३ वा. पर्यंत अखंड २४ तास ।। श्रीराम जय राम जय जय राम ।। या तारक मंत्राचे नामस्मरणरुपी संगीत अनुष्ठान होणार आहे. ८ जानेवारी रोजी रात्री ८ वा. भक्तीरंग प्रस्तुत रामायणाचार्य गोरक्षनाथ दुतारे महाराज (मुंबई दुरदर्शन कलाकार) ह्यांची श्रीराम भजन सेवा (भजन संध्या) व कार्यक्रमा उपरांत महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. ९ जानेवारी रोजी रात्री ८:०० वा. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांचे कृपापात्र शिष्य पं. गिरीराज व्यास (पुणे निवासी) यांचे सुमधुर वाणीत श्री संगीतमय सुंदरकांड (भक्तीमय संगीत कार्यक्रम) व कार्यक्रमा उपरांत महाप्रसाद ठेवण्यात आला आहे. १० जानेवारी रोजी रात्री ८:०० वा. पं. राजेंद्र शर्मा (रामवाला) – गायक सी.ए. सागर शर्मा (नागपुर निवासी) ह्यांचा श्रीराम – हनुमान महिमा वर आधारित ।। एक शाम प्रभु श्रीराम के नाम ।। हा कार्यक्रम, त्यानंतर महाप्रसाद होणार आहे. ११ जानेवारी रोजी सकाळी ९:३० ते दुपारी १२:०० श्रीरामलल्ला प्रतिष्ठा व्दादशी सोहळ्यानिमीत्त सामुहिक महा हनुमान चालिसा पठण व महाआरती दरम्यान सामुहिक भव्य शंखनाद व घंटानाद., सायं. ७ महाआरती व ढोलपथकाचे स्थिर वादन, असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

सर्व कार्यक्रमास सहकुटूंब उपस्थीत राहुन प्रभु श्रीरामांच्या कृपाशिर्वादाचा व दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्यावतीने करण्यात आले आहे.

# खात्यात चुकून जमा झालेली रक्कम व्यापाऱ्याने मर्चंट बँकेस केली परत

नगर – वस्तुपाल मिश्रीलाल गांधी यांचे फर्मचे मे. महावीर एम्पोरियम नावाचे चालू खाते मर्चंट बँक कापड बाजार शाखेत खाते आहे. त्या खात्यात चुकून जमा झालेल्या रू. १,४५,५४४ व १,९२,११४ या रकमा त्यांनी बँकेकडे परत केल्या आहेत. त्या बद्दल त्यांचे कौतुक होत आहे. बँकेचा IFSC नंबर व त्यांच्या खात्याचा नंबर सदृश (१०३) असल्याने या पूर्वीही अशा काही रकमा त्यांच्या खात्यात जमा झाल्या होत्या त्याही त्यांनी वेळोवेळी परत केल्या आहेत.



असा वारंवार होणारा त्रास टाळण्यासाठी बँकेने योग्य ती कारवाई करावी असे त्यांचे म्हणणे आहे.

# श्वेतांबर जैन मूर्तीपूजक गुजराती समाजाचा ९ फेब्रुवारी रोजी वधू-वर परिचय मेळावा

नगर – श्वेतांबर मुर्तीपूजक गुजराती समाजातील शिक्षीत, उच्चशिक्षित उमेदवारांचा ३८ वा जैन वधू–वर परिचय मेळावा व परिचय पुस्तिका प्रकाशन सोहळा ९ फेब्रुवारी रोजी पुण्यातील अत्याधुनिक नंदुभवन कोंढवा येथे होणार आहे.

या वर्षी उच्चशिक्षित वधू–वर मेळावा स्वतंत्र घेण्यात येणार नाही. समाजातील उच्चशिक्षीत मुला–मुलींनी यात सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष दिलीप मेहता व मेळावा प्रमुख अजय शहा यांनी केले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील जैन श्वेतांबर मूर्तीपूजक गुजराथी समाजातील मुला–मुलींना २० जानेवारीपर्यंत ऑनलाईन फॉर्म भरण्याची शेवटची मुदत आहे. स्थानिक प्रतिनिधी – भरत कांतीलाल शहा (कांतीलाल साकळचंद, मो.बा.९४२३०४५९२९), दिलीप मेहता (पुणे अध्यक्ष, मो.बा.९८२२०७९०१५)




# मनपाची सर्व प्रभाग कार्यालये सुट्टीचे दिवशीही चालु राहणार

नगर – सन २०२४–२०२५ हे आर्थिक वर्ष संपण्यास अल्पसा कालावधी शिल्लक राहीलेला असल्याने व मालमत्ता कर, पाणीपट्टी जास्तीत जास्त वसुली पुर्ण होणेकामी तसेच मालमत्ता कर भरणा करणाऱ्या नागरीकांची गैरसोय होवू नये, यादृष्टीने महानगरपालिकेची वसुलीची सर्व प्रभाग कार्यालये सर्व शासकीय सुट्ट्यांचे दिवशी, तसेच प्रत्येक शनिवारी, दुपारी २.०० वाजेपर्यंत चालु राहणार आहेत. मालमत्ताधारकांनी आपल्याकडील थकबाकीसह संपूर्ण कराचा भरणा करावा, असे आवाहन मनपाने केले आहे.


## श्री श्वेतांबर स्थानकवासी जैन संघ

रंभाबाई पितलिया जैन धर्म स्थानक, नवीपेठ, अहिल्यानगर.

## वार्षिक सर्वसाधारण सभा


श्री श्वेतांबर स्थानकवासी जैन संघ, अहिल्यानगर या संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना सुचीत करण्यात येत आहे की, या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार दिनांक १८/०१/२०२५** रोजी दुपारी ४.३० वाजता **रंभाबाई पितलिया जैन धर्म स्थानक**, नवीपेठ, अहिल्यानगर. येथे आयोजित केली आहे.

– सभेपुढील विषय –

१) मागील दिनांक २१/०९/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२) सन २०२३ – २०२४ या वर्षाचे ताळेबंद व नफा तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३) मा. ऑडिटर यांची नेमणूक करणे व त्यांचा मुशाहिरा ठरविणे.
४) सन २०२४ – २०२५ चे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करणे.
५) मा. अध्यक्ष साहेबांच्या परवानगीने आयत्या वेळी सभे पुढे येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**संतोष रमणलाल गांधी**
सेक्रेटरी
श्री श्वेतांबर स्थानकवासी जैन संघ, अहिल्यानगर

टीप :-
१) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास अर्ध्या तासा नंतर त्याच ठिकाणी सभेचे कामकाज होईल.
२) सन २०२३ – २०२४ पर्यतचे ऑडिट झालेले उत्पन्न खर्च व ताळेबंद पत्रक सभासदांना अवलोकन करणेसाठी नितीन शांतीलाल कटारिया १२ मार्केटयार्ड, अहिल्यानगर येथे दि. १३ व १४ जानेवारी २०२५ या कालावधीत दुपारी २ ते ३ या वेळेत उपलब्ध होतील.
३) उत्पन्न खर्च व ताळेबंद पत्रकावरील सभासदांचे प्रश्न दिनांक १५/०१/२०२५ रोजी दुपारी ५ वाजे पर्यंत नितीन शांतीलाल कटारिया १२ मार्केटयार्ड, अहिल्यानगर येथे स्विकारले जातील याची कृपया नोंद घ्यावी.
४) सन २०२३–२४ चे उत्पन्न खर्च व ताळेबंद यापुर्वी आपणास दिनांक ०४/०१/२०२५ च्या नोटीस बरोबर पाठविले आहेत.
५) ज्या सभासदांचे पत्ते बदलले असल्यास आपले पत्ते संस्थेस लेखी कळविणे.











# डॉक्टर वर्धमान कांकरीया यांना ‘ग्लोबल रिफ्रॅक्टिव्ह सर्जरी फेलोशिप’

पुणे – एशियन आय हॉस्पिटल, पुणेचे डॉ. वर्धमान कांकरीया यांनी ’वर्ल्ड कॉलेज ऑफ रिफ्रॅक्टिव्ह सर्जरी अँड व्हिज्युअल सायन्सेस’ (यूके) कडून ’ग्लोबल रिफ्रॅक्टिव्ह सर्जरी फेलोशिप’ मिळवून ऐतिहासिक कामगिरी केली आहे. महाराष्ट्रातून हा सन्मान प्राप्त करणारे ते एकमेव आणि भारतातील पाच निवडलेल्या रिफ्रॅक्टिव्ह सर्जन्सपैकी एक आहेत. रिफ्रॅक्टिव्ह सर्जरी क्षेत्रातील त्यांच्या आजीवन योगदानासाठी हा सन्मान देण्यात आला आहे.



हा सन्मान प्रा. आर्थर कमिंग्स (यूके) आणि WCRSVSच्या बोर्डाने डॉ. कांकरीया यांचे संशोधन व क्लिनिकल प्रगती जागतिक स्तरावर महत्त्वपूर्ण ठरल्याने प्रदान केला आहे. या यशामुळे, डॉ. कांकरीया हे पहिल्या वर्गातील रिफ्रॅक्टिव्ह सर्जन्सच्या यादीत समाविष्ट झाले असून त्यांना रिफ्रॅक्टिव्ह सर्जरीतील बोर्ड प्रमाणपत्र व फेलोशिप मिळाली आहे. WCRSVS ने रिफ्रॅक्टिव्ह सर्जरीला स्वतंत्र शाखा म्हणून प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी हा बोर्ड स्थापन केला आहे, ज्यामुळे हा सन्मान अधिक महत्त्वाचा ठरतो.

डॉ. वर्धमान कांकरीया हे रिफ्रॅक्टिव्ह सर्जरीचे आंतरराष्ट्रीय अग्रणी मानले जातात. त्यांनी ५० हून अधिक आंतरराष्ट्रीय संशोधनपत्रे प्रसिद्ध केली असून अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार व सन्मान प्राप्त केले आहेत तसेच त्यांचे नाव लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये देखील नोंदवले गेले आहे.

सन्मान स्वीकारल्यानंतर डॉ. वर्धमान कांकरीया, रिफ्रॅक्टिव्ह कॅटरॅक्ट सर्जन, एशियन आय हॉस्पिटल म्हणाले, आंतरराष्ट्रीय स्तरावरील सन्मानप्राप्त डॉक्टरांच्या यादीत माझे नाव आहे, याचा मला खूप अभिमान आहे. रिफ्रॅक्टिव्ह सर्जरीमध्ये अधिक प्रगती व रुग्णांसाठी चांगले उपचार देण्याची प्रेरणा मला मिळाली आहे. माझ्या सहकाऱ्यांचे, रुग्णांचे आणि हितचिंतकांचे मनः पूर्वक आभार.

डॉ. वर्धमान कांकरीया यांची ही कामगिरी प्रेरणादायी आहे, जी नवनवीन संशोधन व उत्कृष्टतेसाठीची त्यांची बांधिलकी दर्शवते. या यशामुळे आशियाई आय हॉस्पिटल हे अग्रगण्य नेत्रचिकित्सा केंद्र म्हणून ओळखले जात आहे.

# नगर एमआयडीसीमध्ये परकिय गुंतवणूक आणावी

## विनायकराजं प्रतिष्ठानची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

नगर – नगर एमआयडीसी–मध्ये परदेशी कंपन्यांची गुंतवणुक आणावी अशी मागणी विनायकराजं प्रतिष्ठानचे अध्यक्ष विपुल वाखुरे यांनी मुख्यमंत्री द्रेवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या निवासस्थानी नागपूर येथे भेट घेऊन केली आहे.



विनायकराजं प्रतिष्ठानचे अध्यक्ष विपुल वाखुरे यांनी मुख्यमंत्री द्रेवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या निवासस्थानी नागपूर येथे भेट घेतली.

अहिल्यानगर शहरातील एमआयडीसीमध्ये नविन परदेशी कंपन्यांची गुंतवणुक आणावी, एमआयडीसीमध्ये गेल्या ४० वर्षात नविन कुठलीही कंपनी आलेली नाही, जिल्हा व शहरातील तरुणांना रोजगाराची नितांत गरज आहे, जिल्हाभरातुन युवक युवती शिक्षण व नोकरीसाठी शहरात येतात पण त्यांची निराशा होते. क्षेत्रफळानुसार अहिल्यानगर जिल्हा मोठा आहे त्याचप्रमाणे या जिल्ह्याचे प्रमुख शहर म्हणुन अहिल्यानगर शहराकडे पाहिल जात, यासाठी नोकरीच्या नविन संधी निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

अहिल्यानगरमधील एमआयडीसीमध्ये परदेशी कंपन्या आणाव्यात ज्यातुन नविन नोकरीच्या संधी उपलब्ध होतील व तरुणाईला त्यांच्याच शहरात / जिल्ह्यात रोजगार मिळेल. दरवर्षी शेकडो विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेऊन उत्तीर्ण होतात व नाईलाजास्तव त्यांना नोकरीसाठी शहर / जिल्हा सोडावा लागतो. जर याच शहरात त्यांची नोकरीची सोय झाली तर आई वडिलांसोबत तरुणांना राहता येईल व आई वडिलांची काळजी घेता येईल. यासाठी लागणाऱ्या नविन / जुनी जागा शासकीय पातळीवर उपलब्ध करुन द्यावी, अशी मागणी विनायकराजं प्रतिष्ठानमार्फत करण्यात आली. यावेळी विपुल वाखुरे पा., पवन पारिक, विशाल बुऱ्हाडे, साहिल नहार आदी उपस्थित होते.


आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्यावत सुविधांयुक्त

## इंडो आयरिश हॉस्पिटल

आयोजित

हृदयरोग, मधुमेह, उच्चरक्तदाब, पाठदुखी, गुडघेदुखी, स्त्रीरोग, बालरोग, किडनी विकार, डायलेसीस, जनरल सर्जरी, कान, नाक, घसा

## मोफत सर्व रोग तपासणी शिबीर

सकाळी १० ते ५ वा. (रविवार सोडुन)

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना | आयुष्मान भारत योजना | मुख्यमंत्री सहाय्यता निधी

- मोफत अँन्जीओप्लास्टी
- माफत डायलेसीस/किडनी विकार
- माफत कर्करोग शस्त्रक्रिया
- मोफत नवजात अतिदक्षता विभाग
- मोफत अपघात व पॉली ट्रॉमा फ्रॅक्चर

सर्व कॅशलेस सुविधा उपलब्ध | मोफत साखर तपासणी | २४ तास अत्यावश्यक व ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध | ॲडमिशनची गरज भासल्यास ५०% पर्यंत सवलत

सोनेग्राफी, एक्स–रे, पॅथालॉजी, सीटी स्कॅन, २डी इको, ईसीजी, एन्जीओग्राफी, वंधत्व निवारण व इतर सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत

शिबीरस्थळ

इंडो आयरिश हॉस्पिटल
तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर.
फोन : 0241-2423336,
मो. 9130423336, 9860310001

टिप : नांव नोंदणी आवश्यक
मोफत ओ.पी.डी.


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# निरामय

## लिची की चेरी?

आहारतंत्र

मधुमेहींसाठी कोणती फळं योग्य, याबाबत सतत चर्चा झडत असतात. मधुमेह झाल्यानंतर काही फळं आहारातून वर्ज्य करावी लागतात तर काही फळं काही प्रमाणात खाता येतात. काही फळं मधुमेहींसाठी लाभदायी ठरतात. पावसाळ्यात मिळणाऱ्या लिची आणि चेरी या फळांबाबतही हाच प्रश्न उपस्थित होतो.

एखादं फळ किंवा पदार्थ मधुमेहींसाठी योग्य की अयोग्य हे त्याच्या ग्लायसेमिक इंडेक्सवरून ठरतं. कर्बोदकयुक्त पदार्थाच्या रक्तातल्या साखरेवर होणाऱ्या




परिणामावरून त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स (जीआय) ठरतो. कमी ग्लायसेमिक इंडेक्सचे पदार्थ मधुमेहींसाठी योग्य मानले जातात. ५५ किंवा त्यापेक्षा कमी जीआय असणाऱ्या घटकांचा रक्तात साखर सोडण्याचा वेग खूप कमी असतो. म्हणजेच रक्तातली साखरेची पातळी अचानक वाढत नाही. लिची आणि चेरी यांचा जीआय अनुक्रमे ५० आणि २२ आहे. त्यामुळे मधुमेहींनी चेरी खायला हरकत नाही. मात्र लिची प्रमाणात खायला हवी. एका वेळी मध्यम आकाराच्या चार ते पाच लिची खाता येतील, असं तज्ज्ञ सांगतात.

## धोका गर्भाशयाच्या कर्करोगाचा

आरोग्यवेध

भारतामध्ये दर आठ मिनिटांनी एका महिलेचा गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगामुळे मृत्यू होतो. ही हृदयद्रावक सत्यता परिस्थितीची गंभीरता दर्शवते. गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग हा महिलांमधील कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूंचा प्रमुख कारण ठरतो. या रोगामुळे दरवर्षी ७६ हजार महिलांचा मृत्यू होतो. भारतातील महिलांमध्ये हा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वसामान्य कर्करोग ठरतो. हा आजार टाळता येण्यासारखा असूनही, गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोग आणि त्याच्या जोखमींबाबत सर्वांत अज्ञान आहे. त्यामुळे उशिरा निदान होते आणि मृत्यूदर वाढतो.



गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे प्रमुख कारण म्हणजे 'ह्युमन पॅपिलोमाव्हायरस' (एचपीव्ही) या विषाणूंच्या उच्च-जोखीम प्रकारामुळे होणारा संसर्ग. २०० हून अधिक प्रकारांच्या या विषाणूंपैकी काही प्रकार असामान्य पेशींमध्ये बदल घडवून आणून कर्करोगाला कारणीभूत ठरतात.
भारतामध्ये गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे सर्वाधिक प्रमाण आहे. ग्रामीण भागांमध्ये, जागरूकतेचा अभाव आणि आरोग्यसेवा सुविधांपर्यंत पोहोचण्याची अपुरी क्षमता लवकर निदानास अडथळा ठरते. महिलांना लक्षणांबद्दल माहिती नसते आणि ती लक्षणे चुकीच्या पद्धतीने समजली जातात किंवा दुर्लक्षित केली जातात. जसे की संभोगानंतर रक्तस्राव, असामान्य स्त्राव, पोटदुखी, सूज आणि क्रिएटिनिन पातळी वाढणे.

**✻ दरवर्षी १.३२ लाख नवे रुग्ण**

भारतामध्ये दरवर्षी गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे अंदाजे १.३२ लाख नवीन रुग्ण आढळतात. चिंताजनक बाब म्हणजे फक्त १८ टक्के लोकांना गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाबद्दल माहिती आहे, आणि त्याहीपैकी फक्त ४-११ टक्के लोकांनी एचपीव्ही लसीकरण केले आहे. ही लस गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाची ८५ टक्के प्रकरणे टाळू शकते.

**✻ ग्रामीण भारतातील आव्हाने**

ग्रामीण भारतामध्ये आरोग्यसेवेच्या सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे लवकर निदान आणि प्रतिबंध करण्यात अडचणी येतात. याशिवाय, महिलांना योग्य वयात 'एचपीव्ही लस देणे हेही एक आव्हान आहे. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगासाठी तपासणी ही लवकर निदान आणि प्रतिबंधासाठी महत्त्वाची पायरी आहे. 'पॅप टेस्ट' आणि 'एचपीव्ही टेस्ट' या प्रमुख तपासण्या आहेत. गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग झाल्यास शस्त्रक्रिया, रेडिएशन थेरपी आणि केमोथेरपी या उपचार पद्धती आहेत. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या उपचारांमध्ये किरणोत्सर्ग थेरपी महत्त्वाची भूमिका बजावते. योग्यवेळी आणि योग्यप्रकारे दिलेला किरणोत्सर्ग, इतर उपचार पद्धतींसह एकत्रित केल्यास कर्करोगाचे व्यवस्थापन प्रभावीरीत्या करता येते आणि रुग्णांच्या जीवनमानात सुधारणा करता येते.


**✻ एकत्रित प्रयत्नांची गरज**

गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे निदान आणि प्रतिबंधासाठी लसीकरण आणि लवकर तपासणी ही दोन मुख्य साधने आहेत. ही दोन साधने योग्यरित्या वापरल्यास कर्करोगाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर कमी केले जाऊ शकते.

## पॅरासिटामॉलच्या गोळ्या घेताय, सावधान!

आरोग्य चर्चा

छोट्या मोठ्या दुखण्यासाठी पॅरासिटामॉलचा वापर करत असाल, तर ते घातक ठरू शकते. पॅरासिटामॉल घेतल्याने शरीराच्या अनेक भागांवर वाईट परिणाम होऊ शकतो, असे नुकत्याच झालेल्या एका अभ्यासातून समोर आले आहे.
पॅरासिटामॉलचा वापर आजकाल सर्रास झाला आहे. डोकेदुखी, ताप किंवा सौम्य वेदनांसाठी डॉक्टरांचा सल्ला न घेता पॅरासिटामॉलचा वापर केला जातो. पॅरासिटामॉलचा वृद्धांच्या मूत्रपिंड आणि हृदयावर वाईट परिणाम होऊ शकतो, असे नुकत्याच झालेल्या एका अभ्यासातून समोर आले आहे. पॅरासिटामॉल हे अंगदुखी आणि ताप कमी करण्यासाठी औषध आहे. यामुळे मेंदूतील रसायनांचा प्रभाव कमी होतो. त्यामुळे वेदना आणि ताप येतो. हे सहसा सौम्य ते सौम्य वेदना, ताप, मायग्रेन आणि संधिवातमध्ये दिले जाते; मात्र ते मर्यादित प्रमाणात घ्यावे. ओव्हरडोजसाठी किंवा दीर्घकाळ हे औषध घेतल्यास शरीराच्या अनेक महत्वाच्या अवयवांचे नुकसान होऊ शकते.



**✻ पचनसंस्था, मूत्रपिंडावर परिणाम**

ब्रिटनमधील नॉटिंघम विद्यापीठातील संशोधकांनी आपल्या अभ्यासात असे सिद्ध केले आहे, की पॅरासिटामॉलच्या जास्त किंवा दीर्घकालीन वापरामुळे पचनसंस्था आणि मूत्रपिंडावर वाईट परिणाम होऊ शकतो. पॅरासिटामॉलचे सेवन विशेषत: वृद्धांसाठी धोकादायक ठरू शकते. पॅरासिटामॉल हे जास्त काळ घेतल्याने पोटात अल्सर होण्याची शक्यता वाढते. हे पोटाच्या पडद्याचे नुकसान करू शकते. त्यामुळे पचन समस्या उद्भवू शकतात. याशिवाय हे औषध मूत्रपिंडावरही परिणाम करते. मूत्रपिंड शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करते; परंतु पॅरासिटामॉलच्या सतत वापरामुळे मूत्रपिंडावरील दबाव वाढू शकतो. वृद्धांमध्ये मूत्रपिंडाचे कार्य आधीच कमकुवत असते, म्हणून पॅरासिटामॉल घेतल्यास ही स्थिती बिघडू शकते.

**✻ हृदयावरही परिणाम**

पॅरासिटामॉलचा परिणाम केवळ पचनसंस्था आणि मूत्रपिंडापुरता मर्यादित नसून त्याचा परिणाम हृदयावरही होतो, असे अभ्यासात नमूद करण्यात आले आहे. वृद्धांमध्ये पॅरासिटामॉलचा सतत वापर केल्यास हृदयरोगाचा धोका वाढू शकतो. पॅरासिटामॉलमुळे रक्तदाबावर ही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे हृदयावर अधिक दबाव पडतो. ज्यांना आधीच हृदयाशी संबंधित समस्या आहेत त्यांच्यासाठी हे औषध अधिक धोकादायक ठरू शकते.


**✻ बचाव कसा करायचा?**

✻ डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय पॅरासिटामॉल घेऊ नका.
✻ पॅरासिटामॉल दीर्घकाळ सतत घेणे टाळा.
✻ वारंवार वेदना किंवा ताप येत असेल तर डॉक्टरांना भेटा.
✻ निरोगी आहार आणि निरोगी जीवनशैलीचा अवलंब करा.

## नखांकडे दुर्लक्ष नको!

व्याधी विचार

नखं हा आपल्या आरोग्याचा आरसा असतो. नखांमधला साधासा बदलही एखाद्या रोगाचा संकेत असू शकतो. जीवनसत्त्वाच्या कमतरतेपासून जंतूसंसर्गापर्यंत बरंच काही नखांमधून अधोरेखित होत असतं. नखांवर पडलेले पांढरे चट्टे किंवा डाग जीवनसत्त्वं किंवा विशिष्ट अन्नघटकाच्या कमतरतेचं द्योतक असू शकतं किंवा नखांच्या मुळाशी दुखापत झाल्याने अशा खुणा दिसू शकतात. ॲलर्जीमुळेही या खुणा दिसू शकतात. अर्थात याची लक्षणं लवकर लक्षात येत नाहीत. त्यामुळे नखांवरचे पांढरे चट्टे किंवा डागांकडे आपण दुर्लक्ष करतो. यासोबतच मेनिक्युअर आणि नेल पेंट्सचा सततचा वापर यामुळेही नखांचं बरंच नुकसान होऊ शकतं. क्वचित प्रसंगी हृदयविकार, मज्जासंस्थेशी संबंधित विकार आणि अनारोग्यामुळेही नखांवर विशिष्ट खुणा दिसतात.



प्रत्यक्षात नखं किंवा त्यांच्या आसपासच्या त्वचेत झालेल्या बदलाकडे दुर्लक्ष करू नये. दाह, दुखापती आणि पांढऱ्या डागांसोबतच नखांवर काळपट,करड्या रंगाचे चट्टे आढळले तर अधिक सतर्क होण्याची गरज आहे. अशा परिस्थितीत तातडीने तज्ज्ञांचा सल्ला घ्यायला हवा.

नखांखाली रक्त साकळणं, काही औषधांचे दुष्परिणाम या कारणांमुळेही नखांवर काळपट डाग पडू शकतात. मात्र हे एका दुर्धर व्याधीचं लक्षण असू शकतं हेही आपण लक्षात घ्यायला हवं. अमेरिकन अकादमी ऑफ डर्मिटॉलॉजीच्या म्हणण्यानुसार नखांवरची काळी रेष किंवा डाग त्वचेच्या कॅन्सरचं लक्षण असू शकतो. हा छोटासा काळा डाग सर्वात घातक अशा मेलानॉमा या कॅन्सरकडे अंगुलीनिर्देश करू शकतो यावर आपला विश्वास बसू शकणार नाही. त्वचेचा कॅन्सर आपल्या नखांखालीही वाढू शकतो.

कमकुवत नखं, नखांवर चिरा पडणं, नखांच्या आसपास रक्तस्राव होणं, नखांवरचा वाढत जाणारा काळपट डाग, नखांच्या आसपासच्या त्वचेचा रंग बदलणं, नखांमध्ये पू होणं, त्वचेवरच्या तीळाचा रंग बदलणं ही सुद्धा त्वचेच्या कॅन्सरची काही लक्षणं असू शकतात. याकडे दुर्लक्ष झालं तर हा कॅन्सर संपूर्ण शरीरात अगदी झपाट्याने पसरू शकतो.

नखांमध्ये होणाऱ्या कोणत्याही बदलाकडे आपण पटकन लक्ष देत नाही. असेल एखादी दुखापत असं म्हणून साफ दुर्लक्ष करतो. मात्र नखांमधला साधासा बदलही कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाचं लक्षण असू शकतो यावर आपला पटकन विश्वास बसणार नाही. म्हणून नखांवरचा कोणताही डाग नेल पॉलिशखाली लपवू नका. साधीशी दुखापत म्हणून त्याकडे दुर्लक्षही करू नका. अर्थात यामुळे घाबरून जाण्याचं काहीच कारण नाही. काळपट डाग हे त्वचेच्या कॅन्सरचं लक्षण असू शकतं. त्यामुळे कोणताही धोका टाळण्यासाठी आपण प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी करून घेणं योग्य ठरतं. त्यामुळे शरीरातच्या प्रत्येक अवयवाकडे लक्ष देणं गरजेचं आहे.

## सप्लिमेंट्स ठरतात घातक!

नवसंशोधन

वजन कमी करणं असो, स्नायूंची क्षमता वाढवणं असो किंवा शरीरातली ऊर्जा टिकवून ठेवणं असो; सध्याच्या काळात आहाराला पूरक अशी सप्लिमेंट्स घेतली जातात. जीवनसत्त्वांचा अभाव दूर करण्यासाठी गोळ्या घेतल्या जातात. स्नायूंची क्षमता वाढवणाऱ्या विविध पावडरच्या जाहिराती येत असतात. मात्र हे सर्व आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे.



त्यातही लहान मुलं आणि तरुणांच्या आरोग्याच्या दृष्टीने अशी सप्लिमेंट्स घातक ठरू शकतात. शून्य ते २५ या वयोगटातल्या लोकांवर सप्लिमेंट्सच्या परिणामांचा होणारा वापर शास्त्रज्ञांनी अभ्यासला. अशा सप्लिमेंट्सच्या वापरामुळे अकाली मृत्यू, अपंगत्व किंवा रुग्णालयात दाखल होण्याची वेळ येऊ शकते, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे.

## कशी राखायची तोंडाची निगा?

दंतारोग्य

तोंडाची स्वच्छता आरोग्याच्या दृष्टीने किती गरजेची आहे हे आपण जाणतो. पण त्याकडे आपलं दुर्लक्षच होतं. तोंडाच्या स्वच्छतेबाबत भरपूर माहिती उपलब्ध असल्यामुळे नेमकी सुरूवात कशी करायची, असा प्रश्न आपल्याला पडतो. खरं तर तोंडाची स्वच्छता राखण्याची सवय लहानपणापासूनच अंगी बाणायला हवी. दात घासण्यासाठी योग्य ब्रशचा वापर करणं गरजेचं आहे. शक्यतो मऊ ब्रशचा वापर करा. नायलॉनच्या धाग्यांपासून बनवलेला गोलाकार ब्रश वापरणं गरजेचं आहे, असं तज्ज्ञ सांगतात.



## सॅनिटायझर : योग्य की अयोग्य?

आपण कुठे चुकतो?

सध्याच्या काळात हातांच्या स्वच्छतेसाठी हॅंड सॅनिटायझरचा वापर होतो. प्रवासादरम्यानही हॅंड सॅनिटायझरमुळे हात झटपट स्वच्छ होतात. लहानग्यांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येक जण हॅंड सॅनिटायझर बाळगतो. मात्र वारंवार सॅनिटायझर वापरणं योग्य ठरतं का? याचे काही दुष्परिणाम आहेत का? जाणून घेऊ या.



बाजारात विविध प्रकारचे हॅंड सॅनिटायझर मिळतात. तुमच्या सॅनिटायझरच्या निवडीवर बरंच काही अवलंबून असतं. प्रत्येक सॅनिटायझर वेगळा असतो. तज्ज्ञांच्या मते किमान ६० टक्के अल्कोहोल असणारा सॅनिटायझर वापरायला हवा. अल्कोहोल नसलेल्या सॅनिटायझर्सचा फारसा उपयोग होत नाही. असे सॅनिटायझर्स प्रभावीपणे जंतू नष्ट करू शकत नाहीत. त्यातच ते आरोग्यासाठीही हानिकारक ठरतात. काही काळानंतर जंतू अशा सॅनिटायझर्सना प्रतिकारही करू लागतात. त्यामुळे अल्कोहोल नसलेल्या सॅनिटायझर्सचा वापर करू नये.

ट्रायक्लोसॅन हा घटक असणारे सॅनिटायझर्सही टाळायला हवेत. ट्रायक्लोसॅनच्या सततच्या संपर्कामुळे शरीरातल्या काही थायरॉइड हार्मोन्सचं प्रमाण कमी होतं आणि जंतू प्रतिजैविकांना प्रतिकार करू लागतात.

## ही फळं आहेत प्रभावी

आयुर्वेद आणि विकार

उच्च रक्तदाबावर फक्त औषधांनी नियंत्रण मिळवता येत नाही. या औषधांनी काही काळासाठी बरं वाटलं तरी त्यांचा दीर्घकालीन वापर आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतो. संतुलित आहार आणि नियमित व्यायाम हा रक्तदाब नियंत्रणात ठेवण्याचा एक मार्ग आहे. यासोबतच फळांच्या रसांचं योग्य पद्धतीने सेवन केल्याने बरेच लाभ होऊ शकतात. काही फळं उच्च रक्तदाबाच्या दृष्टीने गुणकारी ठरतात. साखरविरहित फळांचे रस आहारात समाविष्ट करायला हवेत.



डाळिंबामध्ये रक्तदाब नियंत्रणात ठेवणारे गुणधर्म असतात. यात अ, क आणि ई ही जीवनसत्त्वं आणि फॉलिक ॲसिड असतं. यातल्या पोटॅशियममुळे रक्ताभिसरणाची प्रक्रिया सुधारते. डाळिंबातले ॲंटिऑक्सिडंट्सही प्रभावी ठरतात. डाळिंबाच्या रसाचा आहारात समावेश केल्याने जंतूसंसर्ग टाळता येतो.

संत्र हा क जीवनसत्त्व आणि फायबरचा प्रमुख स्रोत आहे. यातले मॅग्नेशियम आणि पोटॅशियम हे घटक रक्तदाब नियंत्रणात ठेवतात. संत्र्याच्या रसामुळे चयापचय क्रियाही सुधारते.

उच्च रक्तदाबाच्या रुग्णांनी क्रॅनबेरीचा रस घ्यायला हरकत नाही. या फळातही क जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असतं. यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहू शकतो.

## करा प्रदूषणापासून बचाव

डोळ्यांचं आरोग्य

वाढत्या प्रदूषणामुळे वातावरणात धूर आणि धुक्याचं प्रमाण वाढत चाललं आहे. यामुळे डोळ्यांना बराच त्रास होतो. अशा वातावरणात डोळ्यांची विशेष काळजी घ्यावी लागते. धुरामुळे डोळे जळजळत असतील तर बाहेरून घरी आल्यावर डोळ्यांवर थंड पाणी मारा. डोळ्यांची सतत उघडझाप करत रहा. मोबाईल, कॉम्प्युटरचा वापर करत असताना डोळ्यांची उघडझाप करणं महत्त्वाचं आहे. बाहेर जाताना मोठ्या आकाराचा गॉगल लावा. प्रदूषित कण डोळ्यात गेल्यानंतर चोळू नका. महत्त्वाचं म्हणजे 'अ' जीवनसत्त्व आणि 'ओमेगा ३' फॅटी ॲसिड्सयुक्त आहार घ्या. हिरव्या भाज्या, गाजर यांचं आहारातलं प्रमाण वाढवा.




## प्रदूषणामुळे रक्तात गुठळ्या होण्याचा धोका

वेगळं काही

थंडीमुळे आरोग्य बिघडत असून प्रदूषणाची थंडी आणखीनच धोकादायक बनली आहे. ताज्या संशोधनातून असे दिसून आले आहे, की प्रदूषणामुळे रक्तवाहिन्यांमधील रक्ताच्या गुठळ्या होण्याचा धोका शंभर टक्क्यांनी वाढतो.

नसांमध्ये रक्ताच्या गुठळ्या तयार होणे म्हणजे उच्च रक्तदाब, हृदयविकाराचा झटका आणि ब्रेन स्ट्रोक. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, दरवर्षी ब्रेन स्ट्रोकमुळे होणाऱ्या ५० लाख मृत्यूंना प्रदूषण मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे. इतकेच नाही तर प्रदूषणात सतत श्वास घेतल्याने मानसिक आजारांचा धोकाही वाढतो. ज्या लोकांना रक्तातील साखरेची समस्या आहे किंवा त्यांना आजार आहे. त्यांनी परिस्थिती लक्षात घेता अधिक सतर्क राहावे लागेल. मधुमेह आणि उच्च रक्तदाबाच्या या धोकादायक मिश्रणामुळे हृदयविकाराचा धोका अनेक पटींनी वाढेल. अशा परिस्थितीत आपण सर्दी आणि प्रदूषणाचा प्रभाव कसा कमी करू शकतो आणि साखर आणि रक्तदाब कसे नियंत्रित करू शकतो.



**✻ गंभीर आजाराचा धोका**

हवेतील लहान कण श्वासोच्छ्वासातून फुफ्फुसात, फुफ्फुसातून रक्तापर्यंत, रक्तापासून संपूर्ण शरीरात आणि नंतर सर्व अवयवांपर्यंत पोहोचून नुकसान करतात. त्यामुळे गंभीर आजारांचा धोका वाढतो. प्रदूषणाचा फुफ्फुस, डोळे आणि मेंदूवर वाईट परिणाम होतो.

**✻ काय उपाय?**

✻ प्रदूषणाचा फुफ्फुसांवर सर्वाधिक परिणाम होतो. फुफ्फुसांना बळकटी देण्यासाठी श्वसरीचा उष्टा प्या.
✻ रोज मसाला चहा पिणेदेखील फायदेशीर ठरेल. ज्या लोकांना घशाच्या ॲलर्जीची समस्या आहे त्यांनी मिठाच्या पाण्याने गुळण्या कराव्यात
✻ लिकोरिस खाल्ल्याने घशाला आराम मिळतो आणि ॲलर्जीची समस्या दूर होते. याशिवाय झोपण्यापूर्वी तळव्यावर कोमट मोहरीचे तेल लावा. यामुळे आराम मिळेल. तसेच नाभीमध्ये मोहरीचे तेल लावावे. नाकात मोहरीचे तेल लावल्यानेही आराम मिळेल.

## प्रभावी शिकेकाई

आजीबाईचा बटवा

सध्या अनेकांना केसांच्या समस्या भेडसावतात. प्रदूषण, रसायनयुक्त उत्पादनांचा वापर, आहाराच्या चुकीच्या सवयी यामुळे केसांचं आरोग्य बिघडत चाललं आहे. केस गळणं, पांढरे होणं, कोंडा होणं या सर्वसाधारण समस्या आहेत. केसांना नैसर्गिक पोषण मिळवून देणारे अनेक घटक असले तरी शिकेकाईच्या नियमित वापरामुळे केसांच्या अनेक समस्या दूर होऊ शकतात. टाळूची त्वचा स्वच्छ ठेवणं हा केसांचं आरोग्य उत्तम राखण्याच्या प्रक्रियेतला पहिला टप्पा आहे. शिकेकाईमुळे टाळूला थंडावा मिळतो. टाळूची त्वचा कोरडी पडत असेल तर शिकेकाईचा वापर योग्य ठरतो. शिकेकाईमध्ये बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म असतात. यामुळे टाळूवरची त्वचा स्वच्छ होते. कोंड्याची समस्याही शिकेकाईमुळे दूर होऊ शकते.





गुरु गोरक्षनाथ प्रतिष्ठाण व गोरक्षक मित्र परिवार व सकल हिंदु समाजाच्या वतीने जिल्हातील गोरक्षकांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन निमंत्रण पत्रिकेचे पुजन माळवाडा येथील श्री विशाल गणेश मंदिरात करण्यात आले. याप्रसंगी महंत संगमनाथ महाराज, गोकुळ आठरे पाटील आदी.

# गुरु गोरक्षनाथ प्रतिष्ठानच्या वतीने १२ जानेवारीला गोरक्षकांचा सत्कार

## श्री विशाल गणपती मंदिरात निमंत्रण पत्रिकेचे पूजन

नगर – १२ जानेवारी रोजी वृंदावन लॉन्स्, नगर मनमाड रोड, येथे सायं. ६ वा. गुरु गोरक्षनाथ प्रतिष्ठाण व गोरक्षक मित्र परिवार व सकल हिंदु समाजाच्या वतीने जिल्हातील गोरक्षकांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्याच्या निमंत्रण पत्रिकेचे पुजन माळवाडा येथील श्री विशाल गणेश मंदिरात करण्यात आले. व भाविकांच्या वतीने महाआरती करण्यात आली. याप्रसंगी श्री विशाल गणेश देवस्थानचे महंत संगमनाथजी महाराज, गुरू गोरक्षनाथ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष गोकुळ आठरे पाटील, साहिल टण्णू, प्रशांत मदने, किरण जगताप, श्रेयश नराळ, रोहन चावरे, दिनेश हिरगुडे, सतीश अळकुटे, विकास गोसावी, अक्षय हंपे, विनय गांधी, योगेश ठाकूर, अमित वाघमारे, विजय दंडवते, जालिंदर गायकवाड, नंदू मुळे आदी उपस्थित होते.

गोरक्षकांच्या सत्कार प्रसंगी प्रमुख उपस्थितीत हरियाना येथील पिर पारसनाथजी महाराज, विशालगणपतीचे महंत योगी संगमनाथजी महाराज, हिंदु धर्म प्रखर व्याख्याते हर्षाताई ठाकुर, हरियाणा येथील योगी बालकनाथ, आमदार संग्राम जगताप, आमदार शिवाजीराव कर्डिले, आमदार विठ्ठलराव लंघे,आमदार काशिनाथ दाते उपस्थित राहणार आहेत.

या सत्कार सोहळ्याप्रसंगी गोरक्षक हिंदू बांधव यांनी उपस्थित राहावे असे आवाहन गुरु गोरक्षनाथ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष गोकुळ (नाना) आठरे पाटील यांनी दिली आहे.

# अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी रेल्वे लवकरच ट्रायल बेसवर सुरू होणार

## महाप्रबंधकांचे आश्वासन, शिष्टमंडळाने घेतली रेल्वे महाप्रबंधकांची भेट

नगर – शहराच्या दृष्टीने अनेक वर्षापासून प्रलंबीत असलेला व अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न बनलेल्या अहिल्यानगर–पुणे इंटरसिटी रेल्वे सुरु होण्यासाठी अहिल्यानगर–पुणे इंटरसिटी रेल्वे समितीच्या शिष्टमंडळाने सेंट्रल रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मीना यांची भेट घेऊन निवेदन दिले. मागील १४ वर्षांपासून ४० हजार पेक्षा जास्त नागरिकांच्या स्वाक्षऱ्या घेऊन रेल्वे विभागाकडे पाठपुरावा सुरु असल्याचे स्पष्ट करण्यात आले. खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीमध्ये नगरच्या रेल्वे स्थानकावर आलेले रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मीना यांच्याशी सदर प्रश्नासंदर्भात चर्चा करण्यात आली. लवकरच अहिल्यानगर–पुणे ट्रायल बेसवर इंटरसिटी रेल्वे सुरु करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.



अहिल्यानगर–पुणे इंटरसिटी रेल्वे सेवा सुरू करावी अशा मागणीचे निवेदन रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मीना यांना देताना रेल्वे समितीचे हरजीतसिंग वधवा, प्रशांत मुनोत, संजय सपकाळ, अर्शद शेख, अजय दिघे, अशोक सब्बन आदी.

याप्रसंगी अहिल्यानगर–पुणे इंटरसिटी रेल्वे समितीचे हरजीतसिंग वधवा, प्रशांत मुनोत, संजय सपकाळ, अर्शद शेख, अजय दिघे, अशोक सब्बन, संदेश रपारिया, अनिल सबलोक आदी उपस्थित होते. तसेच इंजिन बिलंब वाचवण्यासाठी दौंड येथे कॉर्ड लाईनचे काम पूर्ण केल्याबद्दल आणि नगरच्या रेल्वे स्थानकावरील नवीन प्लॅटफॉर्मसाठी रेल्वे विभागाचे आभार मानण्यात आले.

सध्या दौंडमध्ये कॉर्ड लाईन, विद्युतिकरण आणि रेल्वे स्थानकाचे काम पूर्ण झाले आहे. शटल ट्रेनसाठी इन्फ्रास्ट्रक्चर तयार आहे. इतकेच नव्हे तर लहान तालुका असलेल्या दौंडमधून पुण्यासाठी एक दैनंदिन शटल ट्रेन आहे. नगर हा एक प्रमुख स्थान असून भारतातील एक मोठे आर्मी बेस आहे. आजच्या नागरी गरजांसाठी अहिल्यानगर–पुणे इंटरसिटी रेल्वे ही काळाची गरज बनली असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

अहिल्यानगर व पुणे दरम्यान दररोज २० हजार हून अधिक प्रवासी प्रवास करतात, तर आठवड्याच्या शेवटी ही संख्या ४० हजार पर्यंत पोहोचते. अहिल्यानगरहून पुण्यापर्यंत रस्त्याने ३ तास लागतात, तर शहरात प्रवेश करण्यासाठी अतिरिक्त १.५ तासांचा वेळ लागतो. अहिल्यानगरहून पुण्यापर्यंत एस्टी स्टँडवरून ८०० बस चालतात. यामध्ये ट्रॅव्हल बस समाविष्ट नाहीत, आणि त्या नेहमीच भरलेल्या असतात. रस्त्यावर अवजड वाहनांमुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. सध्याच्या फोर लेन रस्त्याची क्षमता कमी पडत आहे, त्यामुळे ट्रॅफिक जाम आणि इंधनाची अपव्यय होते. अहिल्यानगर–पुणे दैनंदिन इंटरसिटी ट्रेनमुळे इंधन बचत, प्रदूषण आणि अपघात कमी होतील. दररोज २०,००० पेक्षा अधिक प्रवासी या सोयीचा लाभ घेऊ शकतील. नागरिकांसह सेना दल, रेल्वे पोलिस यांनाही याचा फायदा होईल. रेल्वे उत्पन्नात वाढ होईल, दरवर्षी सुमारे ५ कोटी रुपये मिळू शकणार असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

अहिल्यानगर येथून सकाळी ६:०० वाजता शटल ट्रेन आणि पुण्याहून सायंकाळी ६:३० वाजता अहिल्यानगरकडे इंटरसिटी ट्रेन चालवावी, पर्यायी सर्व पॅसेंजर गाड्या बंद असल्याने पुणे–निजामाबाद आणि दौंड–नांदेड या दोन डेमू रेल्वेला प्रत्येक स्थानकावर थांबा देण्याची मागणी अहिल्यानगर–पुणे इंटरसिटी रेल्वे समितीच्या वतीने करण्यात आली आहे.



सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाचा निंबळक ग्रामस्थांकडून निषेध करण्यात आला.

# सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाचा निंबळक ग्रामस्थांकडून निषेध

नगर – मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचा निषेध निंबळक येथील सर्वपक्षीय नेते व कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ यांच्या वतीने करण्यात आला. राज्यात अलीकडील काळात बऱ्याच वेळेस ग्रामपंचायत कर्मचारी, सदस्य, उपसरपंच, सरपंच यांना शिवीगाळ, धमक्या, मारहाण व हत्यांपर्यंत काही समाजकंटकांची मजल गेलेली आहे. त्यामुळे शासनाकडून असे प्रकार रोखण्यासाठी तात्काळ कठोरात कठोर कायदे करुन त्याची अंमलबजावणी केली पाहीजे, अशी मागणी यावेळी ग्रामस्थांकडून करण्यात आली. ग्रामस्थांकडून काळ्या फीती लाऊन निषेध करण्यात आला. मस्साजोग सरपंच हत्याकांडाचा गुन्हा हा फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून त्यांच्या कुटुंबीयांना न्याय देण्यात यावा. गुन्हेगारांना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी केली.

यावेळी सुदाम घोडके, नानासाहेब दिवटे, डॉ. दिलीप पवार, अजय लामखडे, बी. डी. कोतकर, संदिप गेरंगे, रामदास कोतकर, आप्पासाहेब कांडेकर, रंगनाथ होळकर, मारुती कोतकर, रावसाहेब कोतकर, प्रा.मच्छिंद्रनाथ म्हस्के, बेरड, गवळी, कोरडे, गारुडकर, शिंदे, कोतकर आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

# जागेच्या ताब्यावरून २ गटात शिवीगाळ व धक्काबुक्की; परस्परविरोधी फिर्यादींवरून ५ जणांवर गुन्हे दाखल

नगर – सावेडी उपनगरातील प्रेमदान चौक परिसरात दत्त मंदिराशेजारी असलेल्या प्लॉट वरील ताब्यावरून दोन व्यावसायिकांच्या गटात शुक्रवारी (दि.३) सायंकाळी वाद होवून एकमेकांना शिवीगाळ व धक्काबुक्की करण्यात आली. या प्रकरणी परस्परविरोधी फिर्यादींवरून तोफखाना पोलिस ठाण्यात ५ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

यातील हितेश गुलशन ओबेरॉय (वय ४२, रा. लालटाकी, नगर) यांच्या फिर्यादी वरून अस्लम बाबासाहेब शेख (रा. छाया टॉकीज जवळ, तोफखाना) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर अस्लम शेख यांच्या फिर्यादी वरून हितेश गुलशन ओबेरॉय (वय ४२, रा. लालटाकी, नगर), गौतम विजय बोरा (रा. चंदन इस्टेट, स्टेशन रोड), मेहता (पूर्ण नाव माहित नाही), सागर गोकुळ गांधी (रा.टिळक रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रेमदान चौक परिसरात दत्त मंदिराशेजारी असलेल्या फायनल प्लॉट क्र.१३० बाबत या दोन्ही गटात न्यायालयात वाद सुरु होता. त्याचा निकाल ओबेरॉय व इतरांच्या बाजूने लागल्याने त्यांनी त्या ठिकाणी बांधकाम चालू करण्यासाठी खडी व इतर साहित्य आणून टाकले. त्यावेळी शेख तेथे गेले व त्यांनी या निकालाबाबत अपील केलेले आहे. तुम्ही येथे बांधकाम करू नका असे म्हणाल्याने त्यांच्यात वाद होवून एकमेकांना शिवीगाळ आणि धक्काबुक्की केल्याचे दोन्ही गटाने फिर्यादीत म्हंटले आहे.

या परस्परविरोधी फिर्यादींवरून पोलिसांनी ५ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या भोवती बॅरीकेट लावण्यात आले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाभोवती बॅरीकेट लावण्याचा पाठपुराव्याला यश

## वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी पक्षाच्यावतीने प्रशासनाचे मानले आभार

नगर – मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळून अवजड वाहन गेल्याने लावण्यात आलेले पेव्हिंग ब्लॉक खचले असून, एखाद्या वाहनाचा धक्का लागून बाबासाहेबांच्या पुतळ्याची विटंबना होण्याचा धोका निर्माण झाला होता. अशा परिस्थितीमध्ये महापालिका प्रशासनाने बाबासाहेबांच्या पुतळ्या शेजारी बॅरीकेट लावण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली होती. मार्केटयार्ड चौकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे काम प्रगतीपथावर आहे. हे काम सुरु असताना जुना अर्धाकृती पुतळ्या त्याच जागेवर असून, त्या भोवताली असलेला संरक्षक भिंती व कठडे हटविण्यात आले आहे. तर पुतळ्या शेजारी पेव्हिंग ब्लॉक बसविण्यात आले आहे. मात्र त्या पेव्हिंग ब्लॉकच्या रस्त्यावरुन रात्री वाहने जात असल्याने लावण्यात आलेले पेव्हिंग ब्लॉक देखील खचले आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने पुतळा परिसराची पहाणी केली होती. जिल्हा प्रशासनाने जिल्हाध्यक्ष योगेश साठे, वंचित बहुजन आघाडीची मागणी लक्षात घेता त्वरित महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या शेजारी बॅरिकेट्स लावल्यामुळे व आंबेडकरांच्या स्मारकास कुठलीही हानी होणार नाही याची दक्षता घेतली यासाठी प्रशासनाचे योगेश साठे यांनी आभार मानले.

# ठाकरे गटाचे ३ माजी नगरसेवक, २ पदाधिकाऱ्यांचा शिंदे गटात प्रवेश

## नगर तालुक्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांचीही तयारी, ५ जानेवारी रोजी ठाण्यात होणार पक्षप्रवेश

नगर – आगामी महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहर व तालुक्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विशेषतः शिवसेनेच्या ठाकरे गटाला मोठी गळती लागली आहे. ठाकरे गटाचे शहरातील तीन माजी नगरसेवक, दोन पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी (दि.३) मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. तर, दोन माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समितीचे माजी सभापती यांच्यासह दोन पदाधिकाऱ्यांनी शिंदे यांच्याशी चर्चा केली. त्यांच्यासह नगर तालुक्यातील इतरांचा रविवारी (दि.५) ठाणे येथे प्रवेश होणार आहे.



ठाकरे गटाचे ३ माजी नगरसेवक, २ पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्तिीत शिवसेनेत प्रवेश केला.

विधानसभा निवडणुकीत अहिल्यानगर शहरातील विधानसभा मतदारसंघाची हक्काची जागा सोडल्याने ठाकरे गटाच्या नगरसेवक व पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे सुमारे १२ ते १५ नगरसेवक पक्ष सोडण्याच्या तयारीत आहे. त्यातील प्रशांत गायकवाड, दत्ता जाधव व दीपक खैरे या तिघांसह शोभना चव्हाण, दिलीप सातपुते यांनीही जिल्हाप्रमुख अनिल शिंदे व शहर प्रमुख सचिन जाधव यांच्या नेतृत्वाखाली शिंदे गटात प्रवेश केला. तसेच नगर तालुक्यातील माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले, शरद झोडगे, माजी पं. स. सभापती रामदास भोर, उपतालुका प्रमुख प्रकाश कुलट, सुशील कदम यांनीही ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देण्याची तयारी केली आहे. त्यांनी एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली. रविवारी ते व तालुक्यातील इतर सदस्य, पदाधिकारी शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचे सांगण्यात आले.

### इतर नगरसेवक संपर्कात, लवकरच त्यांचाही प्रवेश

ठाकरे गटातील बहुतांश नगरसेवक आमच्या संपर्कात आहेत. त्यांच्याशी चर्चा झाली आहे. काहींशी चर्चा सुरू आहे. त्यांचाही लवकरच प्रवेश होणार आहे. नगर तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य व इतर पदाधिकारी रविवारी ठाणे येथे प्रवेश करणार असल्याचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे व शहरप्रमुख सचिन जाधव यांनी सांगितले.

# भाजपाची ध्येय-धोरणे जनसामान्यांपर्यंत पोहवावी

## अभय आगरकर यांचे प्रतिपादन; माळीवाडा येथे सदस्य नोंदणी अभियान

नगर – राज्यात महायुतीचे आणि केंद्रात भाजपाची सत्ता असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने देशातील प्रत्येक घटकांसाठी विविध योजनांच्या माध्यमातून प्रगती साधली आहे. आता राज्यांमध्येही विविध कल्याणकारी योजना सुरु असून या योजनांचा लाभ संबंधितपर्यंत पोहचवण्याचे काम पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी करावे. या योजनांचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. नगर शहरात पक्षाची चांगली ताकद आहे. अनेक कार्यकर्ते भाजपशी जोडले जात आहे. विविध आघाड्यांच्या माध्यमातून पक्षाची ध्येय–धोरणे जनसामान्यांपर्यंत पोहचवावी, असे आवाहन माळीवाडा येथे भाजपच्या सदस्य नोंदणी अभियान प्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी केले.





माळीवाडा प्रभाग १२ मध्ये भाजपच्या वतीने सदस्य नोंदणी अभियानचा शुभारंभ शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांच्या हस्ते करण्यात आला.

माळीवाडा प्रभाग १२ मध्ये सदस्य नोंदणी अभियानचा शुभारंभ अभय आगरकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रदेश सचिव गीता गिल्डा, युवा मोर्चाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य ॲड. अमोल निस्ताने, संतोष गांधी, अनिल निकम, डॉ. दर्शन करमाळकर, महावीर कांकरिया, कालिंदी केसकर, नीता फाटक, सुरेखा जंगम, कावेरी घोरपडे आदी उपस्थित होते

याप्रसंगी अमोल निस्ताने म्हणाले, नगर शहर जिल्हा भाजपाच्यावतीने अहिल्यानगर शहरात ऑनलाईन पद्धतीने सदस्य नोंदणी अभियान सुरु असून विविध भागामध्ये जाऊनपक्षाचे प्रतिनिधी ध्येय–धोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे काम करत आहे. यासाठी प्रभागनिहाय शिबीरे घेण्यात येत आहे. पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने पक्षाला मजबूत करण्याचे काम सुरु असल्याचे सांगितले. यावेळी गीता गिल्डा यांनी नागरिकांना मार्गदर्शन केले. यावेळी सुनील तावरे, दीपक उमाप, रोहित तोलानी, उमेश शिर्के, किशोर रायमोकर, दीपक देहेरेकर, चंदन बारटक्के, सुरेश लालबागे, राजू रासने, अंजली आहेर, उषा आहेर, मीरा सरोदे, राखी आहेर आदी उपस्थित होते.





# डॉ. रमा सिकची-कलंत्री यांचा विखे फाऊंडेशनतर्फे सत्कार

अहिल्यानगर येथील डोळ्यांच्या सर्जन व लहान मुलांचे डोळ्यांच्या स्पेशालिस्ट डॉ. रमा सिकची–कलंत्री यांचा डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन तर्फे माजी खा. सुजय विखे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अखिल भारतीय मेडीकल असोसिएशन तर्फे घेण्यात आलेल्या राज्य व नॅशनल बॅडमिंटन स्पर्धेत त्यांची निवड झाली. डॉ. रमा सिकची–कलंत्री या N.S.FRCS असून त्या लहान मुलांचे सर्जन डॉ. रुपेश सिकची यांच्या पत्नी आहेत.

# रस्त्याच्या कडेला लावलेल्या मोटारसायकलची चोरी; गुन्हा दाखल

नगर – नगर मनमाड रोडवरील एमआयडीसी परिसरातील सनफार्मा कंपनी समोर रस्त्याच्या कडेला हँडेल लॉक करून लावलेली मोटारसायकल (क्र. एम एच १६ ए एस ५९८४) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी शशीकांत सुधाकर शेलार (वय ४५, रा. रेणुकानगर, बोल्हेगाव फाटा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम ३०५ (ब) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# कल्याण रोड परिसरातून अल्पवयीन मुलाचे अपहरण

नगर – सकाळी झोपेतून उठवल्याच्या कारणावरून झालेल्या किरकोळ वादामुळे १६ वर्षीय अल्पवयीन मुलगा कोठेतरी निघून गेला आहे. त्याचा सर्वत्र शोध घेवूनही तो मिळून न आल्याने त्याचे कोणीतरी अपहरण केल्याची तक्रार त्याच्या आईने कोतवाली पोलीस ठाण्यात दिली असून पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

सदर मुलगा कल्याण रोडवरील लोंढे मळा येथून शुक्रवारी (दि.३) दुपारी ४.३० ते ५.३० या कालावधीत बेपत्ता झालेला आहे. त्याच्या कुटुंबीयांनी त्याचा शहर परिसरात सर्वत्र शोध घेवूनही तो मिळून आला नाही त्यामुळे त्याच्या आईने पोलिस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

